पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

# दैनिक युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १८२ । किंमत - ४ रू
संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.)
बुधवार २९/०७/२०२६ । पाने - ८

लग्नाचा बस्ता.. राजेंद्रमध्ये बांधा !
मेन रोड, संगमनेर, फोन : ०२४२५ - २२५७४०, ७९०१०३११५५
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र

## अवैध वाळू तस्करांविरोधात उपसरपंचाचे उपोषण

### जीविताला धोका असल्याचा डोंगरे यांचा गंभीर आरोप

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यातील साकूर पठार परिसरात अवैध वाळू उपसा व वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू असून, त्याला राजकीय आश्रय मिळत असल्याचा गंभीर आरोप जांबूत येथील सामाजिक कार्यकर्ते व ग्रामपंचायत उपसरपंच सुभाष भिमाजी डोंगरे यांनी केला आहे. अवैध वाळू वाहतुकीला विरोध केल्यामुळे आपल्या शेतीतील कपाशी पिकांची ट्रॅक्टरने नासधूस करण्यात आली, तसेच पाणीपुरवठ्याची पाईपलाईन तोडण्यात आल्याचा आरोप त्यांनी प्रशासनाकडे केलेल्या निवेदनातून केला आहे.




डोंगरे यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जांबूत बुद्रुक येथील गट क्रमांक २४/२ व जांबूत खुर्द येथील गट क्रमांक १७४/२ मधील त्यांच्या शेतीचे नुकसान करण्यात आले. या प्रकरणी गणेश डोंगरे, संजय डोंगरे, जनार्दन डोंगरे, मनोहर डोंगरे, राजू डोंगरे, अनाजी डोंगरे आणि श्रीरंग डोंगरे यांच्या विरोधात घारगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करूनही कोणतीही कारवाई झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

याशिवाय, मुळा नदीपात्रात अवैध वाळू वाहतुकीसाठी जांबूत खुर्द येथील वनक्षेत्रातून सुमारे अर्धा किलोमीटरचा रस्ता तयार करण्यात आल्याची तक्रार वन विभागाकडे केल्यानंतर वाळू तस्करांकडून जीवे मारण्याच्या धमक्या मिळत असल्याचाही दावा त्यांनी केला आहे. त्यामुळे स्वत:च्या आणि कुटुंबाच्या सुरक्षिततेबाबत गंभीर चिंता निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

साकूर पठार भागात अवैध वाळू तस्करांची दहशत वाढत असून, अकलापूर येथील एका शेतकऱ्याच्या अंगावर वाळूचा डंपर घालण्यात आल्याच्या घटनेचाही त्यांनी उल्लेख केला आहे. अशा घटनांमुळे शेतकरी भयभीत झाले असून, प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

महसूल व पोलिस प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही प्रभावी कारवाई होत नसल्याने अवैध वाळू तस्करांना प्रशासनाचा पाठिंबा आहे की काय, अशी शंका निर्माण होत असल्याचे डोंगरे यांनी निवेदनात म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने २६ जुलै २०२६ पर्यंत कोणतीही ठोस कारवाई न केल्यामुळे सोमवार, २७ जुलै २०२६ पासून संगमनेर येथील प्रांताधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केल्याची माहिती त्यांनी दिली आहे. या प्रकरणात काही अनुचित घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही त्यांनी निवेदनातून दिला आहे.

## आंदोलकांवर गरजेपेक्षा जास्त लाठी हल्ला - सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

निदर्शने करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाईशी संबंधित याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. न्यायालयाने म्हटले की, विद्यार्थ्यांचे आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण होते, जे घटनात्मक चौकटीत आपली मागणी मांडत होते. लोकशाहीत आंदोलने होत राहतील, त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये पोलीस कारवाईचे स्पष्ट निकष निश्चित केले पाहिजेत. न्यायालयाने असेही म्हटले की, ज्याने कोणी गरजेपेक्षा जास्त बळाचा वापर केला आहे, त्याच्याविरुद्ध कायद्यानुसार कारवाई केली जाईल.



मुख्य न्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांचे खंडपीठ या प्रकरणाची सुनावणी करत आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील गोपाल शंकरनारायणन यांनी सांगितले की, हे प्रकरण केवळ दिल्लीचे नाही, तर मध्य प्रदेश, नागपूर, बिहारसह अनेक राज्यांमधील विद्यार्थ्यांच्या निदर्शनांशी आणि पोलीस कारवाईशी संबंधित आहे.

सुनावणीदरम्यान, सीजीआय सूर्यकांत म्हणाले की, याचिकांमध्ये पेलेट गन, इलेक्ट्रिक बॅटन, लाठीचार्ज, अश्रुधूर आणि महिला व पत्रकारांसोबत कथित मारहाण यांसारखे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या आरोपांची स्वतंत्र, निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी केली जाईल. सीजीआय म्हणाले, जर जबाबदारी निश्चित केली नाही तर चौकशीला काही अर्थ राहणार नाही.

याचिकाकर्त्यांनी आरोप केला आहे की, जंतर-मंतरवर पोलिसांनी ठरलेल्या प्रोटोकॉलचे पालन केले नाही. त्यांनी साध्या वेशातील पोलिसांकडून हिंसाचार, इलेक्ट्रिक शॉक देणाऱ्या शस्त्रांचा वापर, महिलांसोबत गैरवर्तन आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणीही केली.



## संपादकीय...

# निसर्ग संरक्षण आणि संवर्धन काळाची गरज

जागतिक निसर्ग संवर्धन दिन दरवर्षी २८ जुलै रोजी साजरा केला जातो. या दिवशी काही लोक निसर्गाप्रती असलेल्या त्यांच्या जबाबदाऱ्या लक्षात ठेवून त्या पूर्ण करण्याची शपथ घेतात. मात्र तरीही निसर्गाची पर्वा न करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. या दिवसाचा इतिहास आणि महत्त्व जाणून घेऊय. आपण निसर्गाला आई म्हणतो कारण तिने आपल्याला जन्म दिला आहे. ती आपली काळजीही घेते. पण हळूहळू आपण आपल्या आईप्रमाणे निसर्गाला हलके घेत आहोत, त्याचा परिणाम भविष्यात खूप गंभीर होणार आहे. वन्यजीव, नैसर्गिक संसाधने, झाडे, महासागर आणि पर्वत याशिवाय निसर्गाकडून भरपूर खनिजे आणि अनेक सुविधा आपल्याला मिळाल्या आहेत, ज्यामुळे आपण निरोगी आणि आनंदी जीवन जगू शकतो. पण खेदाची गोष्ट म्हणजे त्यांची काळजी घेण्याऐवजी आपण त्यांची नासाडी करत आहोत.पृथ्वीप्रती असलेल्या जबाबदाऱ्यांची आठवण केली पाहिजे. कालांतराने मानवजातीने निसर्गाने दिलेली संसाधने संपुष्टात आणली, वन्यजीवांचा नाश केला. आपल्यासाठी अत्यावश्यक असलेली हवा, ज्यामध्ये आपण राहतो, तीही प्रदूषित झाली आहे. असे असूनही, निसर्ग आपल्याला वेळोवेळी संकेत देत राहतो आणि सांगतो की, सावधगिरी बाळगण्याची अजून वेळ आहे. अशा परिस्थितीत आपण आताही पृथ्वीचे आणि तिच्या संसाधनांचे रक्षण केले नाही तर खूप उशीर होईल. दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील आज म्हणजेच २८ जुलै हा जागतिक निसर्ग संवर्धन दिन लोकांना पुन्हा एकदा पृथ्वीप्रती असलेल्या त्यांच्या जबाबदाऱ्यांची आठवण करून देण्यासाठी साजरा केला जात आहे. या दिवसाचा इतिहास आणि महत्त्व जाणून घेणे आवश्यक आहे.

जागतिक निसर्ग संवर्धन दिन इतिहास असा की, जागतिक निसर्ग संवर्धन दिन दरवर्षी २८ जुलै रोजी साजरा केला जातो. या दिवशी लोकांमध्ये निसर्ग संवर्धनाच्या महत्त्वाविषयी जनजागृती केली जाते. प्रत्येकाच्या लहानशा योगदानाने, आपण आपला ग्रह वाचवू शकतो आणि आपल्याला वारशाने मिळालेला निसर्ग पुनर्संचयित करू शकतो. या दिवसाचा इतिहास काय आणि त्याची सुरुवात कशी झाली याबाबत अद्याप कोणतीही ठोस माहिती उपलब्ध नाही. तथापि, कालांतराने, हवामानातील बदल आणि नैसर्गिक आपत्तींमुळे पृथ्वीची स्थिती किती वाईट झाली आहे हे आपल्याला दिसून आली आहे. आता वेळ आली आहे, की आपण सर्वांनी आपापल्या जबाबदाऱ्या समजून घ्याव्यात आणि निसर्गाचा कोप दाखवण्याची संधी देऊ नये.जागतिक निसर्ग संवर्धन दिन महत्त्व असे की, अनेक वर्षांपासून हवामान बदल ही गंभीर समस्या आहे. ग्लोबल वॉर्मिंग, प्रदूषण आणि प्रजाती नष्ट होण्यामुळे निसर्गात प्रचंड असंतुलन निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे. याशिवाय आपल्या सवयी आणि सुखसोयींचा पृथ्वीवर विपरीत परिणाम होऊ नये यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. या दिवशी निसर्ग समजून घेऊन त्याच्या हितासाठी कार्य करण्यास प्रोत्साहित केले जाते. त्यासाठी अनेक कार्यक्रम आणि चर्चासत्रेही आयोजित केली जातात. तथापि, आपण सर्व गोष्टींपासून वर उठून स्वतःच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या पाहिजेत कारण प्रत्येक थेंब एक महासागर बनवतो. निसर्गातील अनेक घटकांचा वापर आपण आपल्या फायद्यासाठी करतो. परंतु, गरजेपलीकडे जाऊन असे घटक ओरबाडले जाऊ लागल्याने संपूर्ण सृष्टीचक्रातच अडथळे येऊ लागले आहेत. योग्य, शाश्वत आणि नियंत्रित वापराबद्दल सर्वत्र जनजागृती करण्यासाठी हा 'नेचर कॉन्झर्वेशन डे' जगभर पाळला जातो. मूळ संकल्पना व सुरुवात विकास (डेव्हलपमेंट) म्हणजे आपले उद्दिष्ट साधण्याच्या आड येणारे सर्व काही नष्ट करायचे अशी चुकीची संकल्पना. आधुनिक व सुखासीन जीवनशैलीमधून, रुजू लागल्याने पृथ्वीवरील नैसर्गिक समतोल बिघडला. त्याचे परिणाम लवकरच दिसू लागल्याने निसर्ग संरक्षणाची आणि संवर्धनाची जाणीव सर्वांच्या मनात ठसविणे गरजेचे बनले. वस्तू आणि संसाधनांचा पुनर्वापर केल्यानेही खूप चांगला फरक पडतो असेही दिसून आले आहे. सद्या आपण वापरत असलेली नैसर्गिक साधनसंपत्ती तयार होण्यास हजारो वर्ष लागतात. परंतु आपण ती संपविण्याचाच निश्चय केल्यासारखी स्थिती आहे. यामुळे वने, वन्यजीव, वनांतून मिळणारे पदार्थ, खनिजे आणि खनिज इंधने... सर्वच मौल्यवान स्त्रोतांवर असह्य ताण आला आहे व त्याचे परिणाम थोड्याच वर्षात वापरकर्त्याला म्हणजे आपल्यालाच भोगावे लागणार आहेत. जीवनशैलवर नियंत्रण ठेवणे आणि वस्तूंचा पुनर्वापर (३ आर म्हणजे रिड्यूस, रीयुज, रिसायकल) हा उपाय सर्व पातळ्यांवर केल्यासच आशेचा किरण आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखली तरच हा दिवस सार्थकी ठरू शकतो. जागतिक निसर्ग संवर्धन दिन इतिहास- जागतिक निसर्ग संवर्धन दिन दरवर्षी २८ जुलै रोजी साजरा केला जातो. या दिवशी लोकांमध्ये निसर्ग संवर्धनाच्या महत्त्वाविषयी जनजागृती केली जाते. प्रत्येकाच्या लहानशा योगदानाने, आपण आपला ग्रह वाचवू शकतो आणि आपल्याला वारशाने मिळालेला निसर्ग पुनर्संचयित करू शकतो. चांगले पर्यावरण आणि निरोगी मानवी समाजासाठी आज जागतिक निसर्ग संवर्धन दिन साजरा केला जातो. दरवर्षी २८ जुलै हा दिवस जगभरात जागतिक निसर्ग संवर्धन दिन म्हणून ओळखला जातो. पृथ्वीच्या पर्यावरणातून नामशेष होत असलेली वृक्ष आणि प्राण्यांचे संरक्षण करणे हा यामागचा मुख्य हेतू आहे. पाणी, वायु,माती, उर्जा, वनस्पती, खनिज,जीव जंतु यासारख्या निसर्गातील विविध घटकांचे संरक्षण करुन निसर्गाची सुंदरता अबाधित राखणे हे निसर्ग संवर्धन दिनाचे प्रमुख महत्त्व आहे. प्रसिद्ध रुस लेखक लियो टॉलस्टॉयउध्दृत यांनी असे म्हटले आहे की, माणूस आणि निसर्गामध्ये असलेली साखळी कधीच तोडू नये.

# ग्रामस्थांच्या सामूहिक सहभागातून जपली जाते कान्होबा देवस्थानाची आध्यात्मिक परंपरा

युवावार्ता (प्रतिनिधी)

सुकेवाडी - संगमनेर तालुक्यातील सुकेवाडी येथे वसलेले श्री कान्होबा उर्फ कानिफनाथ महाराज देवस्थान हे महाराष्ट्रातील सातवे महत्त्वाचे नाथ सिद्धपीठ म्हणून ओळखले जाते. नाथसंप्रदायाची साधना, ग्रामीण भक्तीपरंपरा आणि ग्रामस्थांचा अखंड सेवाभाव यांचे सुंदर दर्शन या पवित्र देवस्थानात घडते.



देवस्थानात दररोज हिंदू धर्मपरंपरेनुसार श्री कान्होबा देवांच्या समाधीची अत्यंत श्रद्धाभावाने पूजा केली जाते. समाधीला स्वच्छ पाण्याने स्नान घालून गंध, चंदन, हार, फुले अर्पण केली जातात. दररोज सकाळी ६ वाजता गणपती बाप्पा, श्री दत्त महाराज, श्री कान्होबा देव आणि नवनाथांची आरती होते, तर सायंकाळी ७.३० वाजता सायंआरती संपन्न होते. प्रत्येक गुरुवारी विशेष महाआरती आयोजित केली जाते. महाआरतीनंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येते. ही परंपरा सुकेवाडीतील ग्रामस्थांनी अनेक पिढ्यांपासून श्रद्धेने जपली असून आजही गावकऱ्यांच्या सक्रिय सहभागातून सर्व धार्मिक कार्यक्रम पार पडतात.

देवस्थानासाठी गावकऱ्यांनी अधिकृत हिंदू पुजारी म्हणून आकाश शशिकांत सातपुते आणि अशोक महादू खर्डे (रा. सुकेवाडी) यांची नियुक्ती केली असून, ते नित्य पूजा व सर्व धार्मिक विधी नियमितपणे पार पाडत आहेत. दररोजच्या पूजेसाठी हार, कापूर, तूप, तेल, गुलाबजल, अत्तर, अष्टगंध, चंदन, धूप, कापूस, वाती, भस्म, खडीसाखर आदी पूजासाहित्याचा वापर केला जातो. जुलै २०२६ या महिन्यातील ३१ दिवसांच्या नित्य पूजेसाठी सुमारे ३,००० रुपयांचे पूजासाहित्य ग्रामस्थांनी वस्तूरूपाने उपलब्ध करून दिले.

या सेवाकार्यात अनिकेत अशोक कुटे, संतोष निवृत्ती कुटे, सोमनाथ केरू सातपुते, नानासाहेब उत्तम कुटे आणि मधुकर रघुनाथ सातपुते (रा. सुकेवाडी) यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

देवस्थानात प्रत्येक पौर्णिमेला विधिवत होम-हवन आयोजित केले जाते. या धार्मिक विधीसाठी श्रीफळ, तूप, साखर, सुपारी, बदाम, हळकुंड, खारीक, खोबरे, काळे तीळ, सातू, गुग्गुळ, धूप, पेढे, गहू, तांदूळ, पंचामृत, फुले आणि फळे आदी साहित्याचा वापर केला जातो. या होम-हवनासाठी सुमारे ४,००० रुपयांचे साहित्य ग्रामस्थांनी वस्तूरूपाने अर्पण केले आहे. यामध्ये योगेश चंद्रकांत सातपुते, संतोष अशोक कुटे, अनिल आप्पासाहेब कुटे, गौरव माधव नेहे आणि निवृत्ती भाऊसाहेब सातपुते यांनी उदार सहभाग नोंदविला आहे.

# भरत कनोजे यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारतीय सैन्यदलातील व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील (एस. टी.) माजी कर्मचारी कै. भरत सहादू कनोजे (वय ८२ वर्षे) यांचे नुकतेच दुःखद निधन झाले.

देशसेवा आणि लोकसेवा अशा दोन्ही क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय होते. त्यांच्या पश्चात पत्नी गं. भा. गुलाब भरत कनोजे आणि ठकसेन कनोजे, संतोष कनोजे आणि निलेश कनोजे अशी मुले असून सूना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने कनोजे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# भागवतराव वैद्य यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी )



अकोले - अगस्ती कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक भागवतराव लक्ष्मण वैद्य (वय -८५, रा. सुगाव खुर्द,ता. अकोले हल्ली अगस्ती कारखाना रोड, अकोले )यांचे रविवार दिनांक २६ जुलै २०२६ रोजी रात्री ११ वाजता वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.त्यांच्या पच्छात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे, भाऊ, बहिणी असा परिवार आहे.

त्यांच्या पार्थिवावर अकोले येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.प्रगतीशील शेतकरी किरण वैद्य, सुगाव खुर्द विकास सोसायटीचे संचालक प्रशांत वैद्य व सुरेखा दिलीप पानसरे यांचे ते वडील होत.अत्यंत कडक शिस्तीचे असणारे बी एल वैद्य यांनी संगमनेर कारखान्यात शेतकी अधिकारी, कन्नड सहकारी साखर कारखाना, संत दामाजी सहकारी साखर मंगळवेढा तसेच अगस्ती सहकारी साखर कारखाना येथे कार्यकारी संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले .सोलापूर येथे सहकाररत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जगद्गुरू संत जनार्दन स्वामी यांचे ते शिस्य होते.अकोले तालुक्यातील सुगाव खुर्द येथे सर्वात प्रथम जनार्दन स्वामी यांना त्यांनी बोलवले होते. त्यांच्या निधनाने सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे.

# 'आधार'चा सतिचीवाडी शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना मोलाचा आधार



संगमनेर (प्रतिनिधी) : सामाजिक बांधिलकी जपत आधार फाउंडेशन, संगमनेर यांच्या शाळा दत्तक योजनेअंतर्गत जिल्हा परिषदेच्या सतिचीवाडी (वैतागवाडी) येथील दुर्लक्षित आदिवासी शाळेतील विद्यार्थ्यांना २५ हजारांचे अत्यावश्यक शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.

स्व. शांताबाई सूर्यकांत घेगडमल यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सेवानिवृत्त मेजर घेगडमल यांच्या सौजन्याने गेल्या दहा वर्षांपासून दरवर्षी एका गरजू व दुर्लक्षित शाळेला दत्तक घेऊन तेथील विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वितरण केले जाते. यंदा संगमनेर तालुक्यातील सतिचीवाडी (वैतागवाडी) येथील जिल्हा परिषद शाळेची निवड करण्यात आली.

या वेळी शाळेतील ३३ विद्यार्थ्यांना दर्जेदार दप्तर, वह्या, चित्रकला साहित्य, रंगपेटी, पाण्याची बाटली, अंकलिपी, कंपासपेटी, पाटी, पेन्सिल बॉक्स, रायटिंग पॅड, पेन, कंपास, सॅक, सँडल आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना गोड खाऊही देण्यात आला. आवश्यक शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या उपक्रमासाठी आधार फाउंडेशनचे समन्वयक डॉ. महादेव अरगडे यांच्यासह सुखदेव इल्हे, दिपकराव कर्पे, सोमनाथ मदने, नम्रता पवार, ऋषिकेश शिंदे आणि संतोष शेळके उपस्थित होते. आधार परिवारातील सदस्यांनी पहाटे संगमनेरहून प्रस्थान करून मुसळधार पावसात घाण्या डोंगर पार करत शाळेत पोहोचून हा उपक्रम यशस्वी केला.

शाळेत आगमन होताच गावाचे उपसरपंच भाऊसाहेब उगले, भागाजी काळे, समाजसेवक वामनबाबा जाधव, आशा सेविका लक्ष्मी काळे, दीपक काळे, हिरामण काळे, किरण पवार, लहानू पवार, गोपीनाथ वारे तसेच ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थ्यांनी आधार परिवाराचे उत्स्फूर्त स्वागत केले.

कार्यक्रमात सुखदेव इल्हे, दिपकराव कर्पे आणि नम्रता पवार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत शिक्षणाचे महत्त्व व आधार फाउंडेशनच्या सामाजिक कार्याची माहिती दिली. समाजसेवक वामनबाबा जाधव यांनीही गाव व शाळेच्या प्रगतीचा आढावा घेत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमानंतर शाळा व पालकांच्या वतीने उपस्थितांसाठी अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी शाळेचे उपक्रमशील शिक्षक संतोष शेळके यांनी आधार फाउंडेशन, मेजर घेगडमल आणि उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL
Daily Yuvavarta
दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME IS SANGRAM MADHAVRAO JONDHALE
NEW NAME AS SANGRAM MADHAV JONDHALE
ADD – 2419,UPASANI GALLI , GHAS BAJAR, SANGAMNER TAL - SANGAMNER DIST - AHMEDNAGAR

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME MEERA GOPINATH TAJANE
TO NEW NAME MIRABAI GOPINATH TAJANE
BY AFFIDAVIT NO 959/2026 DATE - 27/07/2026
ADD- A/P SHEKAIWADI, TAL.AKOLE,DIST. AHMEDNAGAR,PIN 422601

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME IS IKBAL BABULAL INAMDAR
NEW NAME AS IQBAL BABULAL INAMDAR
UIDAI 730110786324
ADRESS- RAHEMATNAGAR, SANGAMNER - 422605

पाहिजेत
मोरया टॉइज व गिफ्ट शॉप
दुकान कामासाठी होतकरु कामगार पाहिजे
शिक्षण– किमान १० वी
पत्ता– पोफळे मळा, अभंग पेट्रोल पंप समोर
9767880009

पाहिजेत
कापड दुकानासाठी
सेल्समन- २ जागा (पुरूष)
कॉम्प्युटर ऑपरेटर - १ जागा
(अनुभवास प्राधान्य व आकर्षक पगार )
मेन्स स्टुडिओ
नाशिक–पुणे हायवे संगमनेर लॉ कॉलेज समोर, संगमनेर
8830437076
9822882399

पाहिजेत
क्षितिज इलेक्ट्रीकल घुलेवाडी, ता. संगमनेर
अनुभवी अकाऊंटट पाहिजे - २ जागा
(पुर्णवेळ)
MS Offics Tally ज्ञान आवश्यक
– संपर्क –
7007608875

पाहिजेत
मोरया टॉइज व गिफ्ट शॉप
दुकान कामासाठी होतकरु कामगार पाहिजे
शिक्षण– किमान १० वी
पत्ता– पोफळे मळा, अभंग पेट्रोल पंप समोर
9767880009

पाहिजेत
दुकान कामासाठी होतकरू मुले पाहिजेत.
हेल्पर / शिलाई कामगार
महिला - पुरूष
आकर्षक पगार दिला जाईल
अमोल कुशन्स
मार्केट यार्ड, संगमनेर
8805647610
8788483245

फ्लॅट विकणे आहे
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
8788945208
8208223721

पाहिजेत
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट – १ (महिला)
वेळ – सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
8080548282
7498749500

पाहिजेत
पेट्रोल पंप वर 2 कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी कृपया संपर्क करावा.
चैतन्य पेट्रोलियम
संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी, ता. संगमनेर
– संपर्क –
8888808397







फॅकल्टी पाहिजे
अगस्ती अकॅडमी संगमनेर
ऑनलाईन / ऑफलाईन अभ्यासक्रम
पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.
AMVI – 461 जागा MPSC (सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.
सरळसेवा बॅच २०२६ लवकरच सुरू
MPSC राज्यसेवा | गट B गट C | पोलिस भरती | बँकींग परिक्षा | सर्व स्पर्धा परिक्षा
अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवर्ग
सविस्तर मार्गदर्शन
नियमित टेस्ट, PYQ सराव व चर्चा
LIVE + Recorded बॅच सुविधा
वैयक्तिक मार्गदर्शन व शंका निरसन
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र बँकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५
6005401510
9209645727

बुधवार
२९
जुलै २०२६

वर्ष १९ वे
अंक - १८२
पाने - ८
किंमत - ४ रूपये

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

गुरू पौर्णिमेच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !



दैनिक
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता



संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)
RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25



# डी. एम. मुळे चष्मावाला

विश्वासाने जोडलेली २८ वर्षे... गुणवत्तेने उजळलेली प्रत्येक दृष्टी.







## २८ वर्षांची विश्वसनीय परंपरा आणि साथ

आमचे मुळे परिवार मूळ नेवासा येथील आहे. आमचे चुलते पुरुषोत्तम मुळे यांनी ७० वर्षापूर्वी अहमदनगर येथे चष्मा विक्रीचा छोटा व्यवसाय सुरू केला. स्वभावातील विनम्रता, जिद्द आणि उत्कृष्ट ग्राहकसेवा यामुळे छोट्याशा चष्मा दुकानाचे भव्य शोरुम उभे राहिले. डी एम.चष्मावाला या नावाने आमची सर्वत्र ओळख झाली. व्यवसाय विस्तार म्हणून आम्ही श्रीरामपूरला शाखा सुरू केली. श्रीरामपूरला आम्हाला उदंड प्रतिसाद मिळला. उत्कृष्ट ग्राहकसेवा हाच स्थायीस्वभाव असल्याने या व्यवसायात आमचे संपूर्ण कुटुंब कार्यरत झाले. २७ वर्षापूर्वी आमचे चुलते पुरुषोत्तम काकांनी संगमनेर एस.टी. स्टँड जवळ पडतानी कॉम्लेक्स येथे मोक्याचा ठिकाणी डी. एम. चष्मावाला ही फर्म सुरू केली. संगमनेर ची जबाबदारी मला देण्यात आली. मी संगमनेर ला आलो आणि संगमनेरचाच झालो. विनम्रता, संयम, ग्राहकसेवा उत्कृष्ट दर्जा व माफक दर यामुळे डी. एम. चष्मावाला ही फर्म संगमनेर, अकोले, आळेफाटा, सिन्नर, राजूर येथेही प्रसिद्ध झाली. हजारो ग्राहक आणि त्यांचे समाधान हीच आमची संपत्ती आहे. संगमनेर च्या ५० किमी अंतरावरून उद्योजक, अधिकारी, व्यापारी, शेतकरी, मुले, महिला असे ग्राहक आम्हास लाभल्याने आम्ही समृद्ध झालो. ग्राहकसेवा हीच ईश्वरसेवा समजून आम्ही कुणाशीही स्पर्धा करत नाही. ग्राहकरुची ईश्वराचे आशीर्वाद हीच आमची वाटचाल, समाधान आहे. २७ व्या वर्धापन दिनानिमित्त आमचे आदरणीय ग्राहक, हितचिंतक, मित्र मंडळी यांचे ऋण व्यक्त करतो. कृतण्यतापूर्वक आभार मानतो. सर्वांना शुभेच्या.

आमच्या वरील प्रेम, मैत्री यापुढे चिरंतन राहो हीच विनंती.नेहमीच आपल्या ऋणात

- विनय अनिल मुळे,
संचालक, डी. एम. चष्मावाला, संगमनेर

**10% DISCOUNT THIS WEEK**

# अपमानाला कर्तृत्वाने दिलेलं उत्तर : 'मेड इन इंडिया : ए टायटन स्टोरी'






## जे. आर. डी. टाटा पुण्यतिथी विशेष

२९ जुलै हा भारतीय उद्योगविश्वातील महान द्रष्टे उद्योगपती जे. आर. डी. टाटा यांचा स्मृतिदिन. भारतीय उद्योगांना जागतिक दर्जा मिळवून देण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या युगपुरुषाने केवळ उद्योग उभारले नाहीत, तर गुणवत्ता, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रप्रेमाची संस्कृतीही रुजवली. त्यांच्या नेतृत्वाखाली जन्माला आलेल्या 'टायटन' या जागतिक दर्जाच्या भारतीय ब्रँडची प्रेरणादायी कथा 'Made in India : A Titan Story' या वेब सिरीजमधून प्रभावीपणे मांडण्यात आली आहे.टाटा समूहाचा इतिहास पाहिला, तर अपमानाला उत्तर रागाने नव्हे, तर उत्कृष्ट कामगिरीने देण्याची परंपरा दिसते. जमशेटजी टाटा यांना ब्रिटिशांनी हॉटेलमध्ये प्रवेश नाकारला, त्यातून 'ताज' उभा राहिला. रतन टाटा यांचा फोर्ड कंपनीत अपमान झाला, त्याच कंपनीचे 'जॅग्वार' आणि 'लँड रोव्हर' पुढे टाटांनी विकत घेतले. त्याच परंपरेतील आणखी एक घटना म्हणजे एका स्वीस घड्याळ उत्पादकाने भारतीयांकडे घड्याळनिर्मितीचे कौशल्य नसल्याची केलेली उपेक्षा. हा अपमान जे. आर. डी. टाटा यांनी देशाच्या स्वाभिमानाशी जोडला आणि भारतीयांनीच जागतिक दर्जाचे घड्याळ तयार करण्याचा निर्धार केला. त्यातून जन्म झाला **'टायटन'**चा.पत्रकार विनय कामत यांच्या पुस्तकावर आधारित या सहा भागांच्या मालिकेत झेरक्सेस देसाई यांच्या नेतृत्वाखाली टायटनची उभारणी कशी झाली, हे प्रभावीपणे दाखवण्यात आले आहे. झेरक्सेस यांच्या भूमिकेत जिम सार्भ, तर जे. आर. डी. टाटा यांच्या भूमिकेत नसिरुद्दीन शाह यांनी उत्कृष्ट अभिनय केला आहे.मालिकेत टाटा प्रेसच्या पुनरुज्जीवनापासून टायटनच्या कल्पनेचा जन्म, स्वीस कंपनीकडून झालेला अपमान, त्यानंतर स्वबळावर घड्याळनिर्मितीचा घेतलेला निर्णय, तमिळनाडूमध्ये कारखाना उभारणे, प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणे, तांत्रिक अडचणींवर मात करणे आणि जागतिक बाजारपेठेत स्वतःचे स्थान निर्माण करण्याचा संघर्ष अत्यंत वास्तववादी पद्धतीने मांडला आहे. सुरुवातीचे अपयश स्वीकारत संशोधन आणि नावीन्यावर भर देऊन टायटनने जगातील सर्वांत बारीक घड्याळ तयार केले, हा प्रवास प्रेरणादायी ठरतो.या मालिकेतील सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे जे. आर. डी. टाटा यांची नेतृत्वशैली. कर्मचाऱ्यांवर विश्वास, उत्कृष्टतेचा ध्यास, निर्णयाची जबाबदारी स्वीकारण्याची तयारी आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याची त्यांची भूमिका प्रत्येक प्रसंगातून दिसून येते. उद्योग म्हणजे केवळ नफा नव्हे, तर समाजासाठी मूल्य निर्माण करण्याचे माध्यम आहे, हा संदेश त्यांचे व्यक्तिमत्त्व देऊन जाते.आज टायटन हा केवळ घड्याळांचा ब्रँड नाही, तर भारतीय गुणवत्ता, नावीन्य आणि आत्मविश्वासाचे प्रतीक बनला आहे. 'Made in India : A Titan Story' ही केवळ एका कंपनीची कथा नसून भारतीय जिद्द, स्वाभिमान आणि स्वप्नांना वास्तवात उतरवणाऱ्या नेतृत्वाची गाथा आहे.जे. आर. डी. टाटा यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन. अपमानाचे रूपांतर यशात करण्याची ताकद, उत्कृष्टतेचा ध्यास आणि राष्ट्रासाठी काहीतरी मोठे करण्याची प्रेरणा आजही त्यांच्याकडूनच मिळते. म्हणूनच 'Made in India : A Titan Story' ही मालिका प्रत्येक तरुण उद्योजक, व्यवस्थापनाचा विद्यार्थी आणि स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येक भारतीयाने एकदा तरी आवर्जून पाहावी अशीच आहे.

# हनुमान मळा शाळेत 'एक दिवस शाळेसाठी' उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद



युवावार्ता (प्रतिनिधी):

नांदुरी दुमाला - नांदुरी दुमाला येथील हनुमान मळा जिल्हा परिषद शाळेत आषाढी एकादशीच्या पवित्र मुहूर्तावर 'एक दिवस शाळेसाठी' हा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. एकादशीचा उपवास असूनही पालकांनी सकाळपासून दिवसभर श्रमदान करत शाळेच्या विकासासाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या एकजुटीमुळे अनेक प्रलंबित कामे पूर्ण झाली असून समाजापुढे सामूहिक श्रमदानाचा आदर्श निर्माण झाला.

शाळेत विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी रॅम्प उभारणे, भांडी घासण्यासाठी स्वतंत्र जागा तयार करणे तसेच ध्वजस्तंभ उभारणे ही आवश्यक विकासकामे श्रमदानातून पूर्ण करण्यात आली. या कामासाठी लागणारे बांधकाम साहित्य पालकांनी आर्थिक योगदानातून उपलब्ध करून दिले. तसेच कैलास पांडुरंग कवडे यांनी शाळेला ध्वजस्तंभ भेट देऊन उपक्रमात मोलाचे सहकार्य केले.

या श्रमदान मोहिमेत शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ कदम, उपाध्यक्ष ज्ञानदेव कवडे, अमोल कवडे, काकासाहेब नेहे, पांडुरंग खिलारी, ज्ञानेश्वर भांगरे, मनोज शेटे, गणेश खिलारी, संतोष कवडे, भीमा खिलारी, कैलास कवडे, संतोष खिलारी तसेच शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी दिवसभर उत्साहाने श्रमदान करून विकासकामे पूर्णत्वास नेली.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब कोटकर आणि उपाध्यापिका सुवर्णा गोडसे यांनी सर्व पालक, ग्रामस्थ व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार व्यक्त केले. त्यांनी अशा सामूहिक उपक्रमांमुळे शाळेच्या विकासाला चालना मिळण्याबरोबरच समाजात एकात्मता व सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ होत असल्याचे सांगितले.

# गुरुपौर्णिमेनिमित्त नारायणपूरसाठी १५ एसटी बसेस

## प्रवासी उपलब्ध होतात गावातून बस सोडण्याची व्यवस्था




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - गुरुपौर्णिमेनिमित्त पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात श्रीक्षेत्र नारायणपूर येथे होणाऱ्या गुरुपौर्णिमा उत्सवा साठी संगमनेर तालुक्यातील दत्त सेवेकरांची गैरसोय होऊ नये, यासाठी संगमनेर आगाराच्या वतीने १५ जादा एसटी बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे तालुक्यातील भाविकांना नारायणपूर येथे जाण्या साठी मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे.

श्रीक्षेत्र नारायणपूर येथे परमपूज्य विश्वचैतन्य सद्गुरू नारायण महाराज यांच्या कृपाशीर्वादाने तसेच परमपूज्य सद्गुरू टेंबे स्वामी यांच्या मार्गदर्शना खाली महाराष्ट्रातील सर्वात मोठा गुरुपौर्णिमा उत्सव साजरा होणार आहे. या सोहळ्यासाठी महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतून लाखो भाविक नारायणपूर येथे दाखल होत असतात.संगमनेर तालुक्यातूनही दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक दत्त महाराजांच्या दर्शनासाठी नारायणपूर येथे जातात. यंदाही भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन संगमनेर आगाराने एसटी बसेस पाठविण्याचे विशेष नियोजन केले आहे. ज्या गावा तून ५० ते५५ प्रवासी उपलब्ध होतील, त्या गावातून स्वतंत्र एसटी बस सोडण्यात येणार आहे.

जवळे कडलग, राजापूर, चिखली, गुंजाळवाडी, मंगळापूर, पेमगिरी, निमगाव पागा, प्रतापपूर, आश्वी, खळी, पिंपरी, जाखुरी, पिंपरणे आदी गावांसाठी जादा बससेवेची व्यवस्था करण्यात आली आहे. या विशेष बस सेवेचा दत्तसेविकारी भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन संगमनेर अकोले-सिन्नर-राहाता विभागाचे अध्यक्ष बापूसाहेब देशमुख यांनी केले आहे.

# गुरुपौर्णिमा : ज्ञान, सत्य आणि आनंदाचा प्रकाशोत्सव



गुरुपूजन म्हणजे केवळ व्यक्तिपूजन नव्हे, तर ध्येयाचे, ज्ञानाचे, अनुभवांचे आणि विचारांचे पूजन होय. भारतीय संस्कृतीत गुरु हा केवळ शिक्षक नसून जीवनाचा मार्गदर्शक, प्रेरणास्रोत आणि अज्ञानाच्या अंधःकारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेणारा दीपस्तंभ मानला जातो.

गुरुपौर्णिमा, अर्थात व्यासपौर्णिमा, हा हिंदू संस्कृतीतील अत्यंत पवित्र आणि महत्त्वपूर्ण दिवस आहे. प्रत्येक क्षेत्रात गुरुची आवश्यकता असते. गुरु शिष्याच्या जीवनात आनंद निर्माण करतो. एकदा या आनंदाची अनुभूती झाली की संपूर्ण आयुष्य आनंदमय बनते. मग पहाटेच्या दवबिंदूत, मोगऱ्याच्या सुगंधात, हळुवार वाऱ्याच्या झुळुकीत, पहिल्या पावसानंतर दरवळणाऱ्या मृद्गंधात, बालकांच्या निरागस हास्यात आणि शेतकऱ्यांच्या गीतातही आनंदाचा अनुभव घेता येतो.

गुरु शिकवतो की आपण ज्या सुखाच्या आणि आनंदाच्या शोधात आयुष्यभर भटकत असतो, तो प्रत्यक्षात आपल्या अंतःकरणातच वसलेला असतो. कस्तुरीमृगाप्रमाणे आपण बाहेर शोध घेत राहतो; परंतु त्या आनंदाचा स्रोत आपल्या आत्म्यातच आहे, याची जाणीव गुरु करून देतो. ही अनुभूती आणि त्यातून मिळणारे समाधान हेच गुरुचे सर्वात मोठे देणे आहे.

आषाढ शुद्ध पौर्णिमा म्हणजे व्यासपौर्णिमा. हा दिवस महर्षी व्यासांच्या स्मरणाचा आणि पूजनाचा आहे. व्यासांनी मानवजातीला महाभारत हा महान ग्रंथ दिला. या ग्रंथाला 'पाचवा वेद' असे गौरवपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. महर्षी व्यास हे खऱ्या अर्थाने जीवनाचे भाष्यकार आणि हिंदू धर्मपरंपरेचे महान विचारवंत मानले जातात. त्यांच्या स्मरणार्थ सुरू झालेली व्यासपूजा कालांतराने गुरुपूजनाच्या परंपरेत परिवर्तित झाली आणि आज ती गुरुपौर्णिमा म्हणून साजरी केली जाते.

जो लघु नाही तो गुरु असे म्हटले जाते. खरा गुरु कधीही धन, मान, कीर्ती किंवा मोह यांच्या आहारी जात नाही. गुरूंचे पूजन म्हणजे सत्याचे, ज्ञानाचे, अनुभवांचे आणि जीवनमूल्यांचे पूजन होय. त्यांच्या सान्निध्यातून जिज्ञासा, सेवा, नम्रता, संयम आणि विवेक हे गुण आत्मसात करणे हीच खरी गुरुदक्षिणा आहे.

या दिवशी नमोस्तुते व्यास विशालबुद्धे अशी प्रार्थना करून महर्षी व्यासांना वंदन केले जाते. अवधूत दत्तात्रेय महाराज म्हणतात, जो जो जयाचा घेतला गुण, तो म्या गुरु केला जाण. त्यांनी निसर्गातील आणि समाजातील चोवीस गुरू मानले. यामागील संदेश असा की, प्रत्येक व्यक्तीकडून आणि प्रत्येक अनुभवातून काही ना काही शिकण्यासारखे असते. पौर्णिमा म्हणजे प्रकाश. गुरु शिष्याच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश आणतो. अज्ञानाचा अंधःकार दूर करून सत्याचा मार्ग दाखवतो. गुरु म्हणजे तेज, ज्ञान, प्रकाश, सच्चिदानंद, अमृत आणि प्रसाद. आपण कोणाचे तरी शिष्य आहोत, ही भावना म्हणजेच कृतज्ञतेची सर्वोच्च अभिव्यक्ती होय. भारतीय परंपरेत गुरु-शिष्य नात्याची अनेक तेजस्वी उदाहरणे आहेत. शुक्राचार्य, राजा जनक, श्रीकृष्ण-सांदिपनी, विश्वामित्र-श्रीराम, परशुराम-कर्ण, तसेच एकलव्याची गुरुनिष्ठा आजही प्रेरणादायी आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गौतम बुद्ध, संत कबीर आणि महात्मा ज्योतिराव फुले यांना आपले गुरु मानले होते. पाश्चात्य देशांतही गुरु-शिष्य परंपरा तितकीच गौरवशाली आहे. सॉक्रेटिसचा शिष्य प्लेटो, प्लेटोचा शिष्य अरिस्टॉटल आणि अरिस्टॉटलचा शिष्य अलेक्झांडर ही परंपरा जगप्रसिद्ध आहे. भारतातही चाणक्य-चंद्रगुप्त, रामकृष्ण परमहंस-स्वामी विवेकानंद, निवृत्तीनाथ-ज्ञानेश्वर महाराज यांसारख्या गुरु-शिष्य जोड्या इतिहासात अजरामर आहेत.

गुरुपौर्णिमेच्या दिवशी गुरु, श्रीगुरु, सद्गुरु आणि जगद्गुरु यांना वंदन केले जाते. नवजात बालकाची पहिली गुरु म्हणजे माता. चालायला, बोलायला आणि संस्कार शिकवणारा पिता हा दुसरा गुरु. शालेय जीवनात शिक्षक मार्गदर्शक असतात, तर आयुष्याचा खरा अर्थ आणि ध्येय समजावून सांगणारा सद्गुरु असतो. गुरूंचेही अनेक प्रकार सांगितले जातात-चंदनगुरु, विचारगुरु, अनुग्रहगुरु, स्पर्शगुरु आणि दर्पणगुरु. गुरु माणसातील पशुत्व दूर करून त्याला मनुष्यत्वाकडे आणि तेथून देवत्वाकडे घेऊन जातो.

चीनमधील प्रसिद्ध तत्त्वज्ञ कन्फ्यूशियस यांच्याविषयी एक प्रसंग सांगितला जातो. एका शिष्याने आपल्या मुठीत एक छोटा पक्षी धरला आणि गुरूंना विचारले, माझ्या मुठीतील पक्षी जिवंत आहे की मेलेला? जर गुरु म्हणाले मेलेला, तर शिष्य पक्षी सोडणार होता; आणि जिवंत म्हटले असते तर तो पक्षी मारणार होता. कन्फ्यूशियस यांनी शांतपणे उत्तर दिले, याचे उत्तर तुझ्याच हातात आहे. यालाच खऱ्या अर्थाने गुरुचे शहाणपण म्हणतात. गुरु केवळ उत्तर देत नाही; तो शिष्याला योग्य विचार करण्याची दिशा देतो.

गुरु शिष्याला स्वतःचा प्रकाश निर्माण करण्यासाठी प्रेरणा देतो. आनंदाचा खरा ठेवा दाखवतो आणि त्या दिशेने चालण्याची शक्ती देतो. म्हणूनच भारतीय संस्कृतीत गुरुला सर्वोच्च स्थान दिले गेले आहे.

गुरुपौर्णिमा हा केवळ उत्सव नाही, तर कृतज्ञतेचा, आत्मपरीक्षणाचा आणि ज्ञानपूजनाचा दिवस आहे. या पवित्र निमित्ताने सर्व गुरुजनांना, शिक्षकांना, मार्गदर्शकांना आणि ज्ञानदीप प्रज्वलित करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला विनम्र प्रणाम.

।। गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।।

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**

# विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच शाळेचे खरे ध्येय - डॉ. नारायण जाधव

## संत ज्ञानेश्वर विद्यालयात पालक-शिक्षक मेळावा




युवावार्ता (प्रतिनिधी)

नान्नज दुमाला- श्री संत ज्ञानेश्वर माऊली विद्यालय, नान्नज दुमाला येथे पालक-शिक्षक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देत शैक्षणिक गुणवत्ता, शिस्त, उपस्थिती आणि पालकांच्या सहभागाचे महत्त्व यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे तथा माजी प्राचार्य डॉ. नारायण जाधव यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, शाळेत आयोजित होणारे शारीरिक, बौद्धिक, सामाजिक, भावनिक आणि सांस्कृतिक उपक्रम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य आकार देतात. जीवनाचा भक्कम पाया शाळेच्या मैदानावर आणि वर्गखोल्यांमध्ये घातला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच प्रत्येक शाळेचे खरे ध्येय असले पाहिजे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एच. आर. सोनवणे होते. व्यासपीठावर पालक प्रतिनिधी तुषार फड, स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य पांडुरंग फड, सुभाष वारुंक्षे, प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. जयंत सूर्यवंशी, उद्योजक विलास वारुंक्षे, ज्ञानेश्वर गायकवाड आणि ज्ञानेश्वर ढोणे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. मेळाव्यात विद्यार्थ्यांची शालेय शिस्त, शैक्षणिक गुणवत्ता, नियमित उपस्थिती, अभ्यासातील अडचणी, विशेष मार्गदर्शन वर्ग, सराव चाचण्या आदी विषयांवर पालकांशी सविस्तर संवाद साधण्यात आला. तसेच इयत्ता आठवी ते दहावीच्या सराव चाचण्यांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गुलाबपुष्प व पेन देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी माजी विद्यार्थिनी उर्मिला फड, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य पांडुरंग फड, सामाजिक कार्यकर्ते नाना ढोणे व केशव फड, युवा कार्यकर्ते रवींद्र शेळके, नानासाहेब वारुंक्षे, प्रविण चत्तर, संजय सोडनर, रामकृष्ण चत्तर आदी पालकांनी मनोगते व्यक्त करून शाळेच्या उपक्रमांचे कौतुक केले.

पालक प्रतिनिधी तुषार फड, प्रमुख पाहुणे डॉ. नारायण जाधव, मुख्याध्यापक एच. आर. सोनवणे, वसंत बोडखे, मंगेश गडाख आणि एस. एम. वाकचौरे यांनीही पालकांना मार्गदर्शन केले. पालक सूचना व अभिप्राय नोंदवहीत पालकांच्या सूचना व अभिप्राय नोंदवून घेण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्यालयात तक्रार पेटी, विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा समिती, महिला तक्रार निवारण व अंतर्गत तक्रार निवारण समिती, 'सखी सावित्री' समिती तसेच शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विलास गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन बी. आर. पिंगळे यांनी तर आभारप्रदर्शन श्रीमती मनीषा शेळके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संजय शिंदे, बाळासाहेब कुळधरण, बबन दळवी, बाबासाहेब गर्दे, संजय सोनवणे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. पालक-शिक्षक मेळावा उत्साहपूर्ण आणि खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाला.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# कारगिल विजय दिनानिमित्त अहिल्यानगरच्या वीरांचा सन्मान



मुंबई (वृत्तसंस्था)

कारगिल विजय दिनाच्या २७ व्या वर्धापनदिनानिमित्त मुंबई येथील लोककल्याण भवनात आयोजित राज्यस्तरीय गौरव सोहळा देशभक्ती, शौर्य आणि कृतज्ञतेने भारलेला ठरला. महाराष्ट्राचे महामहिम राज्यपाल श्री जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार, मंत्री आशिष शेलार, शंभूराज देसाई, महासंचालक पोलीस सदानंद दाते, तिन्ही दलांचे वरिष्ठ अधिकारी, सैनिक कल्याण विभागाचे संचालक दीपक ठोंगे तसेच कारगिल वीर, वीरपत्नी आणि सैनिक परिवार यांच्या उपस्थितीत हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.

या गौरव सोहळ्यात अहिल्यानगर जिल्ह्याचा अभिमान असलेले कारगिल हिरो एकनाथ पवार, तसेच शहीद जवक अंकुश दादाभाऊ यांच्या वीरपत्नी सौ. कल्पना जवक आणि शहीद भानुदास गायकवाड यांच्या वीरपत्नी सौ. मीनाबाई गायकवाड यांचा महामहिम राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

यापूर्वी अहिल्यानगर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातर्फे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी स्कॉड्रन लीडर विद्यासागर कोरडे यांनीही या वीरांचा सन्मान करून जिल्ह्याच्या वतीने कृतज्ञता व्यक्त केली होती. आता राज्य शासनानेही त्याच शौर्याला सलाम करत या वीरांना सन्मानित केल्याने त्यांच्या बलिदानाला संपूर्ण महाराष्ट्राने मानवंदना दिली.

सन १९९९ मध्ये कारगिलच्या दुर्गम, हिमाच्छादित पर्वतरांगांमध्ये भारतीय जवानांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शत्रूचा पराभव करून प्रत्येक शिखरावर तिरंगा फडकवला. अनेक जवानांनी आपल्या प्राणांची आहुती देत राष्ट्राच्या अखंडतेचे रक्षण केले.

उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, देशाच्या संरक्षणासाठी सैनिक जीवाची बाजी लावतात. मातृभूमीसाठी प्राण अर्पण करणारा सैनिक कधीच मरत नाही; तो राष्ट्राच्या प्रत्येक नागरिकाच्या हृदयात सदैव अमर राहतो. मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी कारगिल युद्धातील सैनिकांच्या पराक्रमाचा गौरव करत सांगितले की, सैनिक अशक्य वाटणारी गोष्ट शक्य करून दाखवतो. दुर्गम, उभ्या कड्यांवर चढून शत्रूकडील ताब्यात गेलेली शिखरे पुन्हा जिंकून भारताचा तिरंगा फडकावणे हा जगाच्या लष्करी इतिहासातील अद्भुत पराक्रम आहे. आपल्या तरुण अधिकाऱ्यांनी आणि जवानांनी राष्ट्रासाठी सर्वस्व अर्पण केले.

# इंदोरीत विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अकोले तालुक्यातील प्रति पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र इंदोरी येथे विठ्ठल-रुक्मिणीचे प्राचीन मंदिर असून देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी आषाढी एकादशीनिमित्त भरणारी यात्रा तालुका व पंचक्रोशीत विशेष महत्त्वाची मानली जाते. आषाढी एकादशीला पंढरपूरला जाऊ न शकणारे हजारो भाविक श्रीक्षेत्र इंदोरी येथे विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहिले.

पहाटे पाच वाजता आ. डॉ. किरण लहामटे व त्यांच्या पत्नी सौ. पुष्पाताई लहामटे यांच्या हस्ते श्री विठ्ठलाची महापूजा संपन्न झाली. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत मंदिर परिसर भाविकांनी फुलून गेला होता. विठ्ठलनामाच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. मंदिर परिसरात खेळणी, प्रसाद व विविध वस्तूंची दुकाने सजली होती, तसेच भाविकांच्या स्वागतासाठी आकर्षक फलक उभारण्यात आले होते.

यात्रेसाठी आलेल्या भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी अकोले मेडिकल फाउंडेशन, रोटरी क्लब अकोले सेंट्रल, हरिश्चंद्र अर्पण ब्लड स्टोरेज सेंटर, अकोले आणि आधार ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत सर्वरोग निदान शिबिर, मोफत नेत्रतपासणी शिबिर आणि रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. आरोग्य शिबिरामध्ये नागरिकांची रक्तदाब, रक्तातील साखर तसेच सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. गरजू रुग्णांना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले. तसेच आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, महात्मा फुले जन आरोग्य योजना, इमारत व इतर बांधकाम कामगार योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, विविध कंपन्यांच्या कॅशलेस सुविधा, तसेच अकोले हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असलेल्या तज्ज्ञ डॉक्टर व आधुनिक वैद्यकीय सुविधांची माहिती देण्यात आली. या शिबिरात १०५ रुग्णांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.

या उपक्रमासाठी डॉ. प्रकाश वाकचौरे, डॉ. प्रतीक घोडके, सिद्धेश वाकचौरे, शांभवी देशमुख (सिस्टर), सोनाली शिंदे, फार्मासिस्ट पूर्वा लांडे, निशा वाकचौरे (सिस्टर) तसेच अकोले मेडिकल फाउंडेशनच्या सचिव सौ. रूपाली वाकचौरे

## रक्तदानासह आरोग्य शिबिरांचे आयोजन



उपस्थित होत्या.

रोटरी क्लब अकोले सेंट्रल व दर्शन रोटरी आय केअर हॉस्पिटल, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नेत्रतपासणी शिबिरात १२७ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी १० रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. या शिबिरासाठी डॉ. गौरव देवळे, शिबिर सहाय्यक संदीप घुले, कौन्सिलर अमोल गुंजाळ आणि चालक बाळासाहेब देशमुख यांनी मोलाचे सहकार्य केले.

या नेत्रतपासणी शिबिरास संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांनी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी रोटरी क्लब अकोले सेंट्रलचे अध्यक्ष गंगाराम करवर, प्रा. विद्याचंद्र सातपुते, संदीप मालुंजकर, निलेश शेठ देशमुख, सचिन देशमुख आणि सचिन आवारी, डॉ.प्रकाश वाकचौरे हे उपस्थित होते. हरिश्चंद्र अर्पण ब्लड स्टोरेज सेंटरच्या रक्तदान शिबिरात १०१ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले. यावेळी गणेश झोडगे, धनाजी माने आणि श्रद्धा जोगेवाड उपस्थित होते. देवस्थान ट्रस्टच्या वतीने दिवसभर भाविकांसाठी खिचडी, केळी आणि मोफत चहाचे वाटप करण्यात आले. रात्री समाजप्रबोधनकार ह.भ.प. विठ्ठलपंत गोंडे महाराज यांचे कीर्तन संपन्न झाले.

या संपूर्ण यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष संतोष नवले, सचिव अशोक धुमाळ, खजिनदार सतीश नवले, सरपंच मनिषाताई ठोंबाडे, पोलिस पाटील अशोक नवले, सुहास नवले, शिवाजी हासे, विद्याधर आग्रे, दिलीप नवले, ज्येष्ठ विधिज्ञ आर. डी. नवले, भाऊसाहेब नवले, संतु नवले,नरेंद्र नवले, प्रकाश नवले, शांताराम मालुंजकर, तुळशीराम नवले, अशोक शिरसाठ, निखिल नवले, तेजस नवले आणि विक्रम नवलेसंदीप नवले, रवी देशमुख, अशोक कडलक, राजू येवले, लक्ष्मण धुमाळ, सचिन जोशी, अनिल धुमाळ, शांताराम नवले,देवस्थान चे सर्व पदाधिकारी,संचालक,सरपंच, उपसरपंच, सदस्य,ग्रामस्थयांनी मोलाचे सहकार्य केले.

# दुचाकींची धडक; दोन ठार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- साकूर-माणूसवाडी मार्गावरील पिंपळगाव देपा रोडवरील रणखांब फाट्यावर आज दुपारी दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन दोघांचा मृत्यू झाला, तर अन्य दोघे जखमी झाले. या भीषण अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

संजय पुना जाधव (वय ४७, रा. माणूसवाडी, रणखांब) व समसुद्दीन बशीर मोमिन (वय ५७, रा. पिंपळगाव देपा) अशी अपघातात ठार झालेल्यांची नावे आहेत. तसेच, बाळू गजाबा जाधव व काशिनाथ चिमा जाधव (दोघेही रा. माणूसवाडी, रणखांब) हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातानंतर स्थानिक ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमींना घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारांसाठी दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी संजय जाधव व मोमिन यांना तपासणीनंतर मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच घारगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे व अंमलदार पी. ए. महाले यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. अंमलदार पी. ए. महाले पुढील तपास करत आहेत.

# करुलेच्या आहेर परिवाराने आईच्या स्मृतीप्रत्यर्थ केले वटवृक्षाचे रोपण



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील करुले येथील कौसाबाई कारभारी आहेर यांच्या स्मृती कायम जागृत राहावयात तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत आहेर परिवाराच्या वतीने स्व आहेर यांच्या दशक्रियाविधी निमित्त आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ आणि शरद महाराज ढवळे यांच्या शुभहस्ते वटवटवृक्षाचे रोपण करण्यात आले

स्मृती जपण्याचा सर्वांत चांगला मार्ग वृक्षारोपण करणे हा आहे.आहेर परिवाराने गावातील दशक्रिया विधी च्या ठिकाणी वटवृक्षाचे रोपण करत पर्यावरण संवर्धनाचा आदर्श घालून दिला आहे या उपक्रमांमुळे दिवंगत मातोश्रीच्या स्मृती चिरंतन राहण्या बरोबरच निसर्ग संवर्धनाला हातभार लागत असून पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याचे आवाहन उपस्थितांनी केले .यावेळी आहेर परिवार सर्व नातेवाईक आणि करुले ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

# दुचाकीवर हृदयाचा झटका, इसमाचा मृत्यू

संगमनेर (प्रतिनिधी) तालुक्यातील वरवंडी येथील केरुनाथ भागवत भोसले (वय ४५) यांचा चालत्या मोटार सायकलवर हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांचे निधन झाले. ही घटना रविवारी (दि. २६) लोणी परिसरात घडली.



केरुनाथ भोसले हे लग्नसमारंभ आटोपून एका सहकाऱ्यासह मोटार सायकलवरून वरवंडीकडे परतत असताना अचानक त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यामुळे मोटार सायकलवरील नियंत्रण सुटून वाहन रस्त्यालगतच्या गटारात जाऊ घसरले. अपघातानंतर त्यांना तातडीने प्रवरा मेडिकल ट्रस्ट रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास लोणी पोलीस करत आहेत. या घटनेमुळे वरवंडी गावात शोककळा पसरली आहे.

# संगमनेरमध्ये प्रवरानदीचे जलपूजन

## प्रवरानदीमुळे तालुक्यातील व जिल्ह्यातील नागरिकांचे जीवन समृद्ध - डॉ. मैथिलीताई तांबे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर (प्रतिनिधी)-- अलनिनोच्या भीतीमुळे यावर्षी नागरिकांमध्ये मोठी चिंता होती. मात्र ईश्वराच्या कृपेने जुलै महिन्यामध्ये भंडारदरा व निळवंडे धरण पूर्ण भरून प्रवरा नदी दुथडी वाहत आहे. या आनंदाचे महाराष्ट्राचे माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेरकरांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले असून संगमनेर मधील महिलांनी प्रवरा नदीची खनानारळाने ओटी भरून तिची पूजा केली .याचबरोबर सर्व नागरिकांच्या जीवनात आनंद निर्माण करणाऱ्या या अमृतवाहिनी बद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

गंगामाई घाट येथे माजी नगराध्यक्ष सौ दुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, शहराध्यक्ष सौ प्रमिलाताई अभंग, नगरसेविका सौ.सीमाताई खटाटे, सौ. सरोजना पगडाल, सौ दिपाली पांचारिया, सौ नंदा गरुडकर, सौ ज्योती अभंग, सौ कलंत्री भावी, डॉ. अनुराधा सातपुते, नगरसेवक मुजीब खान लाला पठाण, भारत बोराडे, सौरभ कासार, बाळासाहेब कानवडे मुकुंद गरुडकर, संजय पगडाल ,अलोक बर्डे , अंबादास आडेप यांच्यासह विविध कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी सर्व महिलांनी प्रवारा नदीची पूजा करून खनानारळाने ओटी भरली याचबरोबर नदीने आपल्या जीवनात आनंद निर्माण केल्याबद्दल तिच्या प्रतिकृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

यावेळी सौ दुर्गाताई तांबे म्हणाल्या की, प्रवरा अमृतवाहिनी ही रतनवाडी येथील अमृतेश्वर मंदिरापासून सुरू होते. या नदीवर भंडारदरा आणि निळवंडे धरण आहे. प्रवरा नदीचे महत्व संगमनेरकर आणि उत्तर नगर जिल्ह्यातील नागरिकांच्या जीवनात मोठे आहे. या नदीमुळे शेती फुलली आहे .जीवनमान फुलले आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी या नदीवर निळवंडे धरण निर्माण केले असून या धरणामुळे दुष्काळी भागात पाणी आले आहे. ही नदी जीवनदायी असून या पुढील काळातही कायम वाहत राहो. सर्वांच्या जीवनात समृद्धी निर्माण होवो अशी प्रार्थना त्यांनी केली.

तर डॉ. मैथिलीताई तांबे म्हणाल्या की, निळवंडे धरणामुळे संगमनेर शहरातील नागरिकांना थेट पाईपलाईन द्वारे दररोज स्वच्छ व मुबलक पाणी मिळत आहे. यावर्षी धरणे लवकर भरल्याने नागरिकांना चांगले पाणी मिळणार आहे. नदीला भारतीय संस्कृतीमध्ये आईची महत्त्व दिले आहे. आणि या अमृतवाहिनीने आपल्या सगळ्यांच्या जीवनात आनंद निर्माण केला आहे. प्रवरा नदीला दुथडी पूर आला असून नागरिकांनी या काळामध्ये सतर्क रहावे याचबरोबर तरुणांनी सेल्फी साठी स्टंटबाजी न करता अधिक काळजी घ्यावी असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी नदीचे पूजन करून तिच्या प्रतिक कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या कार्यक्रमासाठी संगमनेर शहरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# सी. व्ही. रमन बालवैज्ञानिक परीक्षेत ध्रुव ग्लोबलचे यश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ध्रुव ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी शिक्षणक्षेत्रात प्रतिष्ठेच्या मानल्या जाणार्या राज्यस्तरीय 'सी.व्ही.रमन बालवैज्ञानिक परीक्ष'मध्ये अभूतपूर्व यश संपादन केले आहे. राज्य, जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करत ध्रुव ग्लोबलच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या शिरपेचात आणखी एका मानाचा तुरा वाढवला आहे.

या स्पर्धात्मक परीक्षेत इयत्ता सहावीचा विद्यार्थी आरुष केदार सराफ याने नव्वद टक्के गुण मिळवून थेट राज्य स्तरावर दुसरा क्रमांक पटकावला. जिल्हा स्तरावर इयत्ता सातवीच्या कैवल्य नीतिन सूर्यवंशीने ८२ टक्क्यांसह तिसरा क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. केवळ राज्य आणि जिल्हाच नव्हे, तर तालुका स्तरावरही ध्रुव ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आपली चमक दाखवली. इयत्ता सहावीच्या ध्रुव संदीप कोल्हेने ८० टक्क्यांसह प्रथम क्रमांक पटकावला. तर, इयत्ता सातवीची समन्यू योगेश निघूते व अनया अमोल पाठक यांना प्रत्येकी (७४ टक्के) आणि इयत्ता आठवीची अक्षरा नितीन नवले (७३.३३ टक्के) यांनी आपल्या उत्कृष्ट गुणांच्या बळावर द्वितीय क्रमांक मिळवला.

तसेच, या उज्ज्वल यशाची मालिका पुढे सुरु ठेवताना इयत्ता आठवीच्या शार्वेय नैमिष सराफ (७३.३३ टक्के) आणि इयत्ता नववीची उमा प्रविणकुमार पानसरे (७२ टक्के) यांनी चौथा क्रमांक पटकावला, तर इयत्ता सहावीची दिव्याशा योगेंद्र सचदेवने (७२ टक्के) गुणांसह पाचवा क्रमांक मिळवून शाळेच्या यशात भर घातली. विद्यार्थ्यांच्या या यशामागे विद्यार्थ्यांची कठोर मेहनत, शिक्षकांचे योग्य मागदर्शन आणि पालकांचे पाठबळ आहे. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या देदीप्यमान यशाबद्दल शाळेचे चेअरमन डॉ.संजय मालपाणी, व्हा.चेअरमन गिरीश मालपाणी, प्राचार्या संध्या धुळगंडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाची गुणवत्तेत भरारी

## देशात पहिल्या १० मध्ये, राज्यात पहिल्या ४ मध्ये



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारतातील प्रतिष्ठित शैक्षणिक मासिक कॉम्पिटिशन सक्सेसने नुकतीच देशभरातील महाविद्यालयांची गुणवत्ता यादी जाहीर केली असून असलेल्या मा. शिक्षणमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखालील अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा उत्कृष्ट गुणवत्तेमुळे देशातील पहिल्या १० मध्ये तर राज्यांमधून पहिल्या चार मध्ये समावेश असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी आर बाविस्कर यांनी दिली आहे.

महाविद्यालयाच्या यशस्वी कामगिरी बाबत अधिक माहिती देताना प्राचार्य डॉ.पी आर बाविस्कर यांनी सांगितले की, माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात, मा आ. डॉ.सुधीर तांबे व संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीमध्ये कायम अग्रक्रम राखला आहे. दोन वेळेस उत्कृष्ट महाविद्यालय व दोन वेळेस उत्कृष्ट प्राचार्य हा सन्मान मिळवला आहे. या महाविद्यालयास यूजीसी ने नुकताच स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्रदान केला असून अभ्यास निर्मिती, परीक्षा पद्धती, निकाल, प्लेसमेंट या बाबी यशस्वीतेने सुरू आहे. इंडस्ट्रीच्या गरजा नुसार आधुनिक अभ्यासक्रम व डिजिटल शिक्षण प्रणाली आणि संशोधनांना प्रोत्साहन देण्यासह महाविद्यालयाने गुणवत्ता कायम राखली आहे. याचबरोबर एनबीएचे पाच वेळा मानांकन मिळवले आहे. अत्यंत प्रतिष्ठेचा असलेला नॅक चा ए प्लस दर्जा मिळवला आहे.

या मासिकाच्या प्रतिनिधींनी सर्वे करताना महाविद्यालयातील अद्यावत कार्यशाळा, हायस्पीड इंटरनेट ,डिजिटल लायब्ररी, आधुनिक प्रयोगशाळा, पायाभूत सुविधा महाविद्यालयातील शिस्तप्रिय व स्वच्छ वातावरण, हिरवाईने नटलेला परिसर, उच्चशिक्षित प्राध्यापक, संशोधनाला वाव आणि विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपन्यांबरोबर विद्यार्थ्यांच्या नोकरीसाठी समन्वय, भव्य क्रीडांगण, अत्याधुनिक सुविधा, या सर्व बाबींचा विचार करून कॉम्पिटिशन सक्सेस रिव्ह्यू या मासिकाने २०२६ मधील गुणवत्तेनुसार अमृतवाहिनी महाविद्यालयाला देशातून पहिल्या १० मध्ये तर राज्यातून पहिल्या चार मध्ये सन्मान दिला आहे.

महाविद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, कार्यकारी विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे,अकॅडमी डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य डॉ. पी. आर. बाविस्कर, रजिस्टर प्रा. विजय वाघे यांच्यासह सर्व विभागप्रमुख शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

**मा. शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागात असूनही अमृतवाहिनी शिक्षण संस्थेने कायम गुणवत्ता पूर्ण शिक्षण दिले आहे. संशोधनासह आधुनिक शिक्षण प्रणालीचा वापर संस्थेत होत असून विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपन्यांबरोबर असलेल्या समन्वयामुळे विद्यार्थ्यांना चांगल्या पॅकेजवर नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. या महाविद्यालयाला मागील वर्षापासून स्वायत्त दर्जा मिळाला असून मिळालेली मानांकन हे सामूहिक यश आहे.**

**सौ शरयूताई देशमुख**
**कार्यकारी विश्वस्त, अमृतवाहिनी संस्था**

# पावसाची संततधार, प्रवरेला पूर



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- भंडारदरा धरणातून तब्बल १२,२१० क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने प्रवरा नदीने रौद्ररूप धारण केले आहे. पाण्याची आवक प्रचंड वाढल्याने निळवंडे धरण ९५ टक्के भरले असून, नदीपात्रातील पाणी धोकादायक वेगाने वाहत आहे. या पुरामुळे संगमनेर खुर्द येथील पूल पूर्णपणे पाण्याखाली गेला असून, वाहतूक बंद करण्यात आली आहे. नदीकाठच्या रस्त्यांवर नगरपालिका व पोलीस प्रशासनाने बॅरिकेड्स उभारून नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

भंडारदरा परिसरात मुसळधार पावसाचा कहर कायम असून, भंडारदरा येथे ११० मि.मी., घाटघर येथे ११५ मि.मी., तर रतनवाडी येथे ११४ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. धरणक्षेत्रातील अनेक लहान बंधारे व पूल पाण्याखाली गेले आहेत. प्रवरा नदीचा पूर पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली. मुख्याधिकारी दयानंद गोरे यांनी नागरिकांना जीव धोक्यात न घालण्याचे आणि सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे


जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या दमदार पावसामुळे प्रमुख धरणांतील पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली असून, भंडारदरा व निळवंडे धरणे तांत्रिकदृष्ट्या भरली आहेत. मुळा धरणातही अवघ्या २० दिवसांत सुमारे ८.५ टीएमसी पाण्याची वाढ झाली असून, उपयुक्त जलसाठा ५८ टक्क्यांवर पोहोचला आहे. धरणातील पाण्याची पातळी २८ फूटांनी वाढून जलसाठा सुमारे १५ टीएमसी झाला आहे. त्यामुळे आगामी खरीप, रब्बी हंगाम तसेच पिण्याच्या पाण्याच्या दृष्टीने दिलासादायक परिस्थिती निर्माण झाली आहे.

## एकनाथ शिंदे घेणार शिवसेनेच्या मंत्र्यांची शाळा

मुंबई (वृत्तसंस्था)

केंद्रात शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा, 'नीट' व 'एमपीएससी' पेपरफुटीवरून तापलेले राजकारण आणि कॉकरोच जनता पक्षाच्या आंदोलनांमुळे विरोधक आक्रमक झाले आहेत. या वाढत्या राजकीय दबावाच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी अलर्ट मोडवर आले आहेत. आमदारांच्या तक्रारी आणि आगामी आव्हाने लक्षात घेता, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या सर्व मंत्र्यांची एक अत्यंत महत्त्वाची आणि तातडीची आढावा बैठक बोलावली आहे. या बैठकीत मंत्र्यांच्या गेल्या दीड वर्षांतील कामकाजाचा 'रिपोर्ट कार्ड' पाहिला जाणार असून, सुमार कामगिरी करणाऱ्या मंत्र्यांवर कठोर कारवाई किंवा मंत्रिमंडळात फेरबदल होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आज होणाऱ्या राज्य मंत्रिमंडळाच्या नियमित बैठकीनंतर लगेचच ही विशेष बैठक पार पडणार आहे.


गुरू पौर्णिमेनिमित्ता...
श्री ज्ञानेश्वरी प्रवचन
प्रसिद्ध ज्ञानेश्वरी निरूपणकार
आचार्य ह.भ.प. अरुण महाराज फरगडे



बुधवार दि. २९ जुलै २०२६ सायं. ६.०० वाजता
ठिकाण – श्री ज्ञानेश्वर मंदिर, चंद्रशेखर चौक, संगमनेर
निमंत्रक – रमेश काका सराफ व परिवार


# संगमनेर शहर व तालुक्याच्या सामाजिक विकासासाठी ५५ लाखांचा निधी मंजूर

## आमदार अमोल खताळ यांच्या पाठपुराव्याला यश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत संगमनेर शहर व तालुक्यातील सामाजिक आणि सांस्कृतिक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी एकूण ५५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून हा निधी उपलब्ध करून देण्यात आला असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले. या निधीसाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता. मंजूर निधीनुसार संगमनेर नगरपालिकेच्या हद्दीत संत रोहिदास भवनाच्या उभारणीसाठी २५ लाख रुपये, घुलेवाडी येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे गृहनिर्माण संस्थेच्या परिसरात सभामंडप उभारण्यासाठी १५ लाख रुपये, तसेच पठारभागातील खंदरमाळ गावठाणातील संत रोहिदास मंदिरासमोरील सभामंडपासाठी १५ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या तिन्ही विकासकामांमुळे सामाजिक, सांस्कृतिक व सार्वजनिक उपक्रमांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

संत रोहिदास भवनाच्या माध्यमातून विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करता येणार आहे. तसेच घुलेवाडी आणि खंदरमाळ येथील सभामंडपांमुळे स्थानिक नागरिकांना विविध कार्यक्रम, बैठका, धार्मिक व सामाजिक उपक्रमांसाठी कायमस्वरूपी सुविधा उपलब्ध होणार आहेत. या कामांमुळे परिसराच्या विकासाला चालना मिळण्यासोबतच सामाजिक ऐक्य अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. आमदार खताळ यांनी सामाजिक विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध योजनांचा लाभ संगमनेर शहर व तालुक्याला मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू ठेवले असून, आगामी काळातही विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा सुरू राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतून मंजूर झालेल्या या विकासकामांमुळे संत रोहिदास समाजासह सर्वसामान्य नागरिकांना सामाजिक, सांस्कृतिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांसाठी दर्जेदार सुविधा उपलब्ध होतील. संत रोहिदास भवन आणि सभामंडपांच्या उभारणीमुळे समाजोपयोगी उपक्रमांना चालना मिळेल, सामाजिक एकात्मता अधिक दृढ होईल आणि परिसराच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल. संगमनेरच्या विकासासाठी शासनाच्या विविध योजनांमधून जास्तीत जास्त निधी आणण्याचा माझा सातत्यपूर्ण प्रयत्न यापुढेही कायम राहील.**

**आ. अमोल खताळ**

# राजूरजवळ ओढ्यात अनोळखी पुरुषाचा आढळला मृतदेह

## ओळख पटविण्याचे पोलिसांसमोर आव्हान



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - राजूर-कोल्हार-घोटी मार्गावरील स्मशानभूमीजवळील ओढ्यात एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मृतदेहाची अवस्था अत्यंत खराब झाल्याने त्याची ओळख पटविण्याचे मोठे आव्हान राजूर पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

याबाबत राजूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जामगाव येथील हनुमंता भिका पथवे हे दि. २७ जुलै रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजता मोटारसायकलने कोल्हार-घोटी मार्गाने घरी जात होते. यावेळी राजूर स्मशानभूमीच्या पाठीमागील परिसरात नागरिकांची गर्दी दिसल्याने त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. स्मशानभूमीच्या मागील बाजूस प्रकल्प कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत, देशमुख व रावते यांच्या शेतालगत असलेल्या ओढ्यात एका अंदाजे ४५ वर्षीय अनोळखी पुरुषाचा मृतदेह पालथा पडलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यानंतर पथवे यांनी तत्काळ राजूर पोलीस ठाण्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली.

माहिती मिळताच राजूर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने मृतदेह ओढ्यातून बाहेर काढण्यात आला. मृताच्या अंगावर केवळ चॉकलेटी रंगाची अंडरवेअर असल्याचे आढळले. त्यानंतर १०८ रुग्णवाहिकेतून पोलीस हेड कॉन्स्टेबल मंडलिक यांनी मृतदेह ग्रामीण रुग्णालय, राजूर येथे नेला. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून संबंधित व्यक्ती उपचारापूर्वीच मृत झाल्याचे घोषित केले. सध्या मृतदेह शवागारात ठेवण्यात आला आहे. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, या प्रकरणामागे घातपात आहे की अन्य काही कारण, याचा तपास सुरू आहे. तसेच मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू असून, राजूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी वलवे पुढील तपास करीत आहेत.

# पांजरे येथे भूस्खलन; चार कुटुंबांचे कायमस्वरूपी स्थलांतर करण्याची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - अकोले तालुक्यातील पांजरे येथील अड्डुआई परिसरात शुक्रवारी सकाळी झालेल्या भूस्खलनामुळे मोठी दुर्घटना टळली. डोंगर उतारावरील मोठा भाग कोसळून हरी शांताराम उघडे यांचे घर मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले. घरातील आठ शेळ्या व कोंबड्या दरडीखाली गाडल्या गेल्या. मात्र, वेळीच धोका ओळखून कुटुंबीय बाहेर पडल्याने सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

घटनास्थळी पाहणी केल्यानंतर या घराशेजारील आणखी तीन घरेही धोक्याच्या क्षेत्रात असल्याचे स्पष्ट झाले आहे. सध्या या कुटुंबांचे तात्पुरते स्थलांतर करण्यात आले असले, तरी भविष्यात मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर या भागात पुन्हा भूस्खलन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या चारही कुटुंबांचे कायमस्वरूपी सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करणे अत्यावश्यक असल्याची मागणी होत आहे. अन्यथा २०१४ मधील माळीन दुर्घटनेची पुनरावृत्ती होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पांजरे येथील विठ्ठल, सुभाष, रामचंद्र महादू उघडे हे तीन भाऊ तसेच हरी शांताराम उघडे यांच्या वडिलोपार्जित जमिनी भंडारदरा धरण प्रकल्पात संपादित झाल्यानंतर त्यांना गडदुआई परिसरातील डोंगर उतारावरील वन विभागाची (भोगवटदार वर्ग-२) जमीन पुनर्वसनासाठी देण्यात आली होती. गावठाणात जागा उपलब्ध नसल्याने शासनाकडून मंजूर झालेली घरकुले त्यांनी सुमारे आठ वर्षांपूर्वी याच डोंगर उतारावर बांधली होती .गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे डोंगररांगा पूर्णपणे भिजल्या असून शुक्रवारी सकाळी अचानक दरड कोसळून ती थेट हरी उघडे यांच्या घरावर आदळली. घटनेची माहिती मिळताच आमदार डॉ. किरण लहामटे, तहसीलदार सिद्धार्थ मोरे तसेच महसूल प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली व आवश्यक उपाययोजनांच्या सूचना दिल्या. दरम्यान, तात्पुरती व्यवस्था झाली असली तरी कायमस्वरूपी धोका टळलेला नाही. शासनाने आम्हा चारही कुटुंबांना गावठाणात किंवा अन्य सुरक्षित ठिकाणी जागा उपलब्ध करून देत घरकुल उभारण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी विठ्ठल उघडे यांनी केली.


चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर



अत्याधुनिक लॅमिनार ऑपरेशन थिएटर
शस्त्रक्रिया
- मेंदुविकार शस्त्रक्रिया
- खुबा प्रत्योरोपण
- गुडघा प्रत्यारोपण
- पोटाच्या शस्त्रक्रिया
- किडनी शस्त्रक्रिया
- मुत्रविकार शस्त्रक्रिया
- दुर्बिणीद्वारे पोटाच्या व
- आतड्याच्या शस्त्रक्रिया

२४ तास सुविधांसाठी
०२४२५ - २२४७६२
मोबा. ७०३८२७०३८२



सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी



आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✻ कर्ज रक्कम वाढ | ✻ कर्ज व्याजदर कमी | ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
- अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
- माफक दरात - संगमनेर येथेच
- 105 बेड्स
- तज्ञ डॉक्टर्स
- अत्याधुनिक सुविधा

कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध

हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग

सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

## दिनविशेष

२०२१: आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक — रशियन मॉड्यूल नौकाच्या इंजिनातील बिघाडानंतर तात्पुरते नियंत्रणाबाहेर गेले.
१९८७: भारत-श्रीलंका शांतता करार — वर सह्या करण्यात आल्या.
१९८५: टी. एस. पिल्ले — मल्याळम लेखक, यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान करण्यात आला.
१९८०: इराण — देशाने इस्लामिक क्रांतीनंतर नवीन 'पवित्र' ध्वज स्वीकारला.
१९५८: नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस एडमिनिस्ट्रेशन (NASA) — स्थापना.
१९५७: आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्था (International Atomic Energy Agency) — स्थापना.
१९५७: इंटरनॅशनल ऍटॉमिक एनर्जी एजन्सी — स्थापना झाली.
१९४८: ऑलिम्पिक — महायुद्धामुळे १२ वर्षांच्या काळानंतर ऑलिम्पिक स्पर्धांना लंडनमध्ये पुन्हा सुरवात.
१९४८: ऑलिम्पिक — लंडन, इंग्लंड येथे १४व्या ऑलिम्पिक स्पर्धा सुरु.
१९४६: एअर इंडिया — टाटा एअरलाइन्सचे एअर इंडिया असे नामकरण झाले.

## जन्म

१९८१: फर्नांडो अलोन्सो — स्पॅनिश f१ रेस कार ड्रायव्हर
१९५९: संजय दत्त — हिंदी चित्रपट अभिनेते
१९५३: अनुप जलोटा — भजन गायक
१९३७: डॅनियेल मॅकफॅडेन — अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ — नोबेल पारितोषिक
१९२५: शि. द. फडणीस — व्यंगचित्रकार
१९२३: जिम मार्शल — इंग्रज व्यापारी, मार्शल ॲम्प्लीफिकेशनचे संस्थापक (निधन: ५ एप्रिल २०१२ )
१९२२: आर्यभट्ट (निधन: १५ नोव्हेंबर २०२१ )
१९२२: ब. मो. पुरंदरे — लेखक आणि शिवशाहीर
१९०४: जे. आर. डी. टाटा — भारताचे पहिले वैमानिक आणि भारतीय विमान वाहतुकीचे जनक — भारतरत्न, पद्म विभूषण (निधन: २९ नोव्हेंबर १९९३ )

## मृत्यू

२३८: बाल्बिनस — रोमन सम्राट
२०१३: मुनीर हुसेन — भारतीय क्रिकेटरपटू (जन्म: २९ नोव्हेंबर १९२९ )
२००९: महाराणी गायत्रीदेवी — जयपूरच्या राजमाता (जन्म: २३ मे १९१९ )
२००८: इश्मीत सिंग — भारतीय गायक (जन्म: २ सप्टेंबर १९८८ )
२००३: जॉनी वॉकर — हिंदी चित्रपट विनोदी अभिनेते (जन्म: ११ नोव्हेंबर १९२६ )
२००२: सुधीर फडके — गायक संगीतकार (जन्म: २५ जुलै १९१९ )
१९९६: अरुणा असफ अली - स्वातंत्र्यसेनानी — भारतरत्न, पद्म विभूषण (जन्म: १६ जुलै १९०९ )
१९९४: डोरोथीक्रोफूट हॉजकिन — ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ — नोबेल पारितोषिक
१९८७: बिभूतीभूशन मुखोपाध्याय — भारतीय लेखक, कवी आणि नाटककार (जन्म: २४ ऑक्टोबर १८९४ )
१९००: उंबेर्तो पहिला — इटलीचा राजा
१८९१: ईश्वरचंद्र विद्यासागर - बंगाली समाजसुधारक, बंगाली गद्याचे जनक (जन्म: २६ सप्टेंबर १८२० )




# दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**२९ जुलै**

# तंबाखूमुक्त सार्वजनिक ठिकाणांसाठी कठोर अंमलबजावणीची गरज



सिगारेट, तंबाखू, गुटखा आणि इतर तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन ही केवळ वैयक्तिक सवय राहिलेली नसून सार्वजनिक आरोग्यासमोरील गंभीर समस्या बनली आहे. या पदार्थांच्या सेवनामुळे कर्करोग, हृदयविकार, श्वसनाचे आजार यांसह अनेक गंभीर आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन आणि त्यांच्या जाहिरातींवर नियंत्रण ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.महाराष्ट्रातील सार्वजनिक ठिकाणे, शासकीय इमारती, कार्यालये, शैक्षणिक संस्था, रुग्णालये आणि नागरिकांची मोठी वर्दळ असलेल्या परिसरात सिगारेट, तंबाखू व गुटखा यांचे सेवन तसेच त्यांची जाहिरात रोखण्यामागे सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण हा प्रमुख उद्देश आहे. विशेषतः लहान मुले आणि तरुणांवर तंबाखूजन्य पदार्थांच्या आकर्षक जाहिरातींचा प्रभाव पडू नये, यासाठी अशा जाहिरातींना आळा घालणे गरजेचे आहे.केवळ जाहिरातींवर बंदी घालून प्रश्न सुटणार नाही. नियमांची प्रभावी अंमलबजावणी, नियमित तपासणी आणि उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर शाळा-महाविद्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था आणि सामाजिक संघटनांच्या माध्यमातून तंबाखूच्या दुष्परिणामांबाबत व्यापक जनजागृती केली पाहिजे.सार्वजनिक ठिकाणे ही नागरिकांसाठी आरोग्यदायी आणि सुरक्षित असली पाहिजेत. तंबाखूजन्य पदार्थांच्या जाहिरातींना आणि सेवनाला आळा घालणे हे केवळ प्रशासनाचे काम नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. तंबाखूमुक्त महाराष्ट्रासाठी कायद्याची कठोर अंमलबजावणी आणि समाजाचा सक्रिय सहभाग हीच काळाची गरज आहे.

# भारतीय विमान वाहतुकीचे जनक - जे. आर. डी. टाटा

**पुण्यतिथी विशेष**

भारतीय बॅडमिंटनच्या इतिहासात सैद मोदी हे अत्यंत प्रतिभावान आणि यशस्वी खेळाडू म्हणून ओळखले जातात. १९८८ मध्ये त्यांनी राष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेचे विजेतेपद पटकावून सलग आठव्यांदा राष्ट्रीय अजिंक्यपद जिंकण्याचा दुर्मीळ विक्रम आपल्या नावावर केला. १९८० ते १९८८ या कालावधीत त्यांनी भारतीय पुरुष एकेरी गटात सातत्याने वर्चस्व राखत राष्ट्रीय बॅडमिंटनमध्ये स्वतःचे अढळ स्थान निर्माण केले.सैद मोदी यांचा जन्म ३१ डिसेंबर १९६२ रोजी उत्तर प्रदेशातील गोरखपूर येथे झाला. त्यांचे मूळ नाव सैद मेहदी हसन जैदी असे होते. पुढे त्यांनी बॅडमिंटन क्षेत्रात "सैद मोदी" या नावाने प्रसिद्धी मिळवली. लहानपणापासूनच त्यांना बॅडमिंटनची आवड होती. कठोर परिश्रम, वेगवान खेळ आणि आक्रमक शैलीमुळे त्यांनी अल्पावधीत राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली.१९८२ मध्ये त्यांनी राष्ट्रकुल (कॉमनवेल्थ) स्पर्धेत पुरुष एकेरीत सुवर्णपदक जिंकून भारताचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केले. त्यांच्या उत्कृष्ट खेळामुळे भारतीय बॅडमिंटनला नवी ओळख मिळाली आणि अनेक तरुण खेळाडूंना प्रेरणा मिळाली. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले.सैद मोदी यांचा खेळ केवळ त्यांच्या तंत्रामुळेच नव्हे, तर त्यांच्या आत्मविश्वास, चिकाटी आणि मैदानावरील संयमामुळेही विशेष ठरला. त्या काळात भारतीय बॅडमिंटनला जागतिक स्तरावर मोठी ओळख मिळवून देणाऱ्या खेळाडूंमध्ये त्यांचा समावेश होत होता. त्यांनी आपल्या कामगिरीतून दाखवून दिले की कठोर मेहनत, योग्य प्रशिक्षण आणि जिद्द यांच्या जोरावर जागतिक स्तरावर यश मिळवता येते.दुर्दैवाने, २८ जुलै १९८८ रोजी लखनौ येथे त्यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. त्यांच्या अकाली निधनाने भारतीय क्रीडाविश्वाला मोठा धक्का बसला. त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी सैद मोदी इंडिया इंटरनॅशनल बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन केले जाते. सैद मोदी यांचे नाव भारतीय बॅडमिंटनच्या इतिहासातील एका तेजस्वी आणि प्रेरणादायी पर्वाचे प्रतीक म्हणून आजही आदराने घेतले जाते. त्यांच्या विक्रमी कामगिरीमुळे आणि खेळाप्रती असलेल्या समर्पणामुळे ते भारतीय क्रीडाक्षेत्रातील अजरामर व्यक्तिमत्त्व ठरले आहेत.



## 28 व्या वर्धापन दिनानिमित्त विशेष...

# गुणवत्तेची ओळख आणि ग्राहकसेवेचा अखंड प्रवास ... डी. एम. मुळे चष्मेवाला

व्यवसाय मोठा होण्यासाठी मोठे भांडवल आवश्यक नसते; आवश्यक असतो तो प्रामाणिकपणा, गुणवत्तेवरचा विश्वास आणि ग्राहकांशी जपलेले आपुलकीचे नाते. या विचारांचा प्रत्यय गेल्या अठ्ठावीस वर्षांपासून संगमनेरकरांना देणारे नाव म्हणजे डी. एम. मुळे चष्मेवाला. आज डी. एम. मुळे चष्मेवाला आपल्या यशस्वी वाटचालीची २८ वर्षे पूर्ण करून २९ व्या वर्षात पदार्पण करत आहे. एका छोट्याशा दुकानातून सुरू झालेला हा प्रवास आज हजारो ग्राहकांच्या विश्वासाचा, समाधानाचा आणि प्रेमाचा भव्य वटवृक्ष बनला आहे. ही केवळ एका व्यावसायिक संस्थेची यशोगाथा नाही, तर विश्वास, गुणवत्ता, सचोटी आणि माणुसकी यांचा संगम असलेली प्रेरणादायी कहाणी आहे.

मुळे परिवाराचे मूळ गाव नेवासा असले तरी त्यांच्या कष्टांचा आणि प्रामाणिक व्यवसायाचा सुगंध संगमनेरसह संपूर्ण परिसरात दरवळला. घरातील ज्येष्ठांनी अत्यंत साध्या परिस्थितीत चष्मा विक्री व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांची मेहनत, दूरदृष्टी आणि ग्राहकांशी जपलेले स्नेहपूर्ण संबंध यांचा वारसा पुढील पिढीने अधिक आधुनिक दृष्टिकोनातून पुढे नेला. श्री. विनय अनिल मुळे यांनी व्यवसायाची सूत्रे हाती घेतल्यानंतर गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य दिले. बदलत्या काळानुसार अत्याधुनिक तंत्रज्ञान, आधुनिक यंत्रसामग्री, जागतिक दर्जाच्या फ्रेम्स आणि लेन्स यांचा समावेश करून ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देण्याचा ध्यास त्यांनी घेतला. त्यामुळे डी. एम. मुळे चष्मेवाला हे नाव केवळ चष्म्यांच्या विक्रीपुरते मर्यादित न राहता विश्वासाचे प्रतीक बनले. गेल्या २८ वर्षांत हजारो ग्राहकांनी या संस्थेवर नितांत विश्वास व्यक्त केला आहे. अनेक कुटुंबांच्या तीन पिढ्या आजही आपल्या डोळ्यांच्या आरोग्यासाठी आणि चष्म्याच्या गरजेसाठी डी. एम. मुळे चष्मेवालाच पसंती देतात. हा विश्वास कोणत्याही जाहिरातीने मिळत नाही; तो सातत्यपूर्ण सेवा, प्रामाणिक व्यवहार आणि ग्राहक समाधानातूनच मिळतो. संगमनेर शहरासह अकोले, श्रीरामपूर, आळेफाटा, सिन्नर, राजूर, तसेच ग्रामीण भागातील अनेक ग्राहक आजही आवर्जून डी. एम. मुळे चष्मेवाला येथे येतात. प्रत्येक ग्राहकाला त्याच्या गरजेनुसार योग्य मार्गदर्शन, अचूक नंबर तपासणी, उच्च दर्जाचे लेन्स, आकर्षक फ्रेम्स आणि परवडणाऱ्या दरात उत्कृष्ट सेवा देण्याचा प्रयत्न संस्थेने कायम ठेवला आहे. व्यवसायात स्पर्धा असतेच; पण स्पर्धेपेक्षा ग्राहकांचा विश्वास जिंकणे अधिक महत्त्वाचे असते. हा मंत्र अंगीकारून डी. एम. मुळे चष्मेवालाने कधीही तडजोड केली नाही. ग्राहक दुकानातून समाधानी चेहऱ्याने बाहेर पडला, हीच संस्थेची सर्वात मोठी कमाई आहे. बदलत्या तंत्रज्ञानाबरोबर स्वतःमध्ये सातत्याने बदल करत राहणे हे यशाचे गमक आहे. डिजिटल युगात ग्राहकांच्या अपेक्षा बदलल्या, नवीन तंत्रज्ञान आले, फॅशन बदलली; मात्र डी. एम. मुळे चष्मेवालाने प्रत्येक बदल सकारात्मकपणे स्वीकारला. आधुनिक डिझाइन, हलक्या वजनाच्या फ्रेम्स, ब्रँडेड लेन्स, संगणकीकृत तपासणी आणि उत्कृष्ट ग्राहक सेवा यामुळे संस्थेने आपल्या गुणवत्तेचा दर्जा अधिक उंचावला. व्यवसाय म्हणजे केवळ नफा नव्हे, तर समाजाप्रती असलेली जबाबदारीही आहे. विविध सामाजिक उपक्रम, गरजूंना मदत, आरोग्य जनजागृती आणि नेत्रसेवेशी संबंधित उपक्रमांमधून संस्थेने सामाजिक बांधिलकी जपली आहे. त्यामुळे डी. एम. मुळे चष्मेवाला हे नाव केवळ व्यावसायिक प्रतिष्ठान नसून समाजाचा विश्वासू सहकारी बनले आहे. या अठ्ठावीस वर्षांच्या प्रवासात अनेक आव्हाने आली. बदलती बाजारपेठ, वाढती स्पर्धा, आर्थिक चढ-उतार आणि आधुनिक तंत्रज्ञानाची गरज अशा अनेक संकटांना सामोरे जाताना संस्थेने कधीही आपल्या मूल्यांशी तडजोड केली नाही. सचोटी, पारदर्शक व्यवहार आणि ग्राहकांचे हित हेच तत्त्व कायम जपले. आज या यशामागे सर्वांत मोठा वाटा आहे तो ग्राहकांचा. प्रत्येक ग्राहकाने दिलेले प्रेम, विश्वास आणि आशीर्वाद हेच डी. एम. मुळे चष्मेवालाचे खरे भांडवल आहे. ग्राहकांमुळेच हे रोपटे आज विशाल वटवृक्ष झाले आहे.

या २८ व्या वर्धापन दिनानिमित्त श्री. विनय अनिल मुळे यांनी सर्व ग्राहक, हितचिंतक, मित्रपरिवार, कर्मचारी आणि कुटुंबीयांप्रती मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली आहे. आपल्या प्रेमामुळे आणि विश्वासामुळेच आम्ही आज या उंचीवर पोहोचलो आहोत. भविष्यातही अत्याधुनिक सुविधा, सर्वोत्तम दर्जा, प्रामाणिक सेवा आणि ग्राहकांचे समाधान हेच आमचे ध्येय राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यापुढील काळातही नवीन तंत्रज्ञान, जागतिक दर्जाची उत्पादने आणि अधिकाधिक उत्कृष्ट सेवा ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याचा संस्थेचा संकल्प आहे. विश्वासाच्या या पायावर उभी राहिलेली ही संस्था आगामी काळातही यशाची नवी शिखरे सर करेल, यात शंका नाही.

इवलेशा रोपट्यापासून वटवृक्षापर्यंतचा हा प्रवास म्हणजे जिद्द, मेहनत, गुणवत्ता, प्रामाणिकपणा आणि ग्राहकांच्या विश्वासाची सुवर्णगाथा आहे. ही यशस्वी परंपरा अशीच अखंड सुरू राहो आणि समाजसेवा व ग्राहकसेवेचे हे व्रत अधिक बळकट होवो, हीच २८ व्या वर्धापन दिनानिमित्त सदिच्छा. डी. एम. मुळे चष्मेवाला, संगमनेर यांना २८ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा! विश्वासाची परंपरा गुणवत्तेची ओळख आणि ग्राहकसेवेचे अखंड व्रत!

**सुहास सातपुते**
**उपसंपादक, दैनिक युवावार्ता, संगमनेर**




# संगमनेरच्या सुपुत्राची देशातील सर्वोच्च महाविद्यालयात झेप, CUET परीक्षेत घवघवीत यश

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेरच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब समोर आली असून, येथील डॉ. देवेंद्र अमृतलाल ओहरा ज्युनिअर कॉलेज, संगमनेर येथील विद्यार्थी ऋग्वेद सचिन कसाब याने राष्ट्रीय पातळीवरील अत्यंत स्पर्धात्मक मानल्या जाणाऱ्या CUET (Common University Entrance Test) परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.



ऋग्वेद सचिन कसाब या विध्यार्थी ने आपल्या गुणवत्तेच्या जोरावर भारतातील प्रतिष्ठित श्रीराम कॉलेज ऑफ कॉमर्स नवी दिल्ली या देशातील नामांकित वाणिज्य महाविद्यालयात प्रवेश निश्चित केला आहे. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी SRCC हे देशातील सर्वोच्च संस्थांपैकी एक मानले जाते.

विशेष म्हणजे, ऋग्वेदने इयत्ता बारावीच्या परीक्षेतही उल्लेखनीय कामगिरी करत अकाउंट्स आणि गणित या दोन्ही विषयांमध्ये १०० पैकी १०० गुण मिळविण्याचा मान मिळविला आहे. त्याच्या या यशातून त्याची अभ्यासातील गुणवत्ता, विषयांवरील प्रभुत्व आणि सातत्यपूर्ण मेहनत दिसून येते.

संगमनेर शहरातून थेट दिल्लीतील SRCC सारख्या प्रतिष्ठित संस्थेत प्रवेश मिळवणे ही केवळ ऋग्वेदसाठीच नव्हे, तर संपूर्ण संगमनेर तालुक्यासाठी अभिमानाची बाब आहे. त्याच्या यशामागे सातत्यपूर्ण अभ्यास, योग्य नियोजन, मेहनत आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा महत्त्वाची ठरली आहे.

ऋग्वेदच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्याचे पालक, शिक्षकवृंद, मित्रपरिवार आणि बाल शिक्षण मंडळ यांच्या वतीने त्याचे अभिनंदन करण्यात येत आहे. मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर संगमनेरच्या विद्यार्थ्याने राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण केली आहे,अशी भावना व्यक्त करत संस्थेने ऋग्वेदच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# जांबुत खुर्द येथे बिबट्याचा धुमाकूळ

## दोन शेळ्या व एक बोकड फस्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील जांबुत खुर्द येथे बिबट्याने धुमाकूळ घालत शेतकरी किरण रमेश बुरके यांच्या दोन शेळ्या व एक बोकड ठार केले, तर आणखी दोन शेळ्यांना गंभीर जखमी केल्याची घटना दि. २६ जुलै रोजी मध्यरात्री सुमारे १ वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेमुळे जांबुत परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांमध्ये घबराट पसरली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, किरण रमेश बुरके हे जांबुत खुर्द येथील गट क्रमांक १०८ मध्ये वास्तव्यास आहेत. २५ जुलै रोजी सायंकाळी शेळ्या चारून आल्यानंतर त्यांनी त्या घराशेजारी असलेल्या मुक्त गोठ्यात बांधल्या होत्या. मध्यरात्रीच्या सुमारास बिबट्याने गोठ्याच्या जाळीखालून आत प्रवेश करून हल्ला चढवला.

या हल्ल्यात एका शेळीचा गोठ्यातच फडशा पाडण्यात आला. दुसऱ्या शेळीला घराशेजारील गिन्नी गवतात ओढून नेत ठार केले, तर एका बोकडाला ऊसाच्या शेतात फरफटत नेऊन फस्त केले. याशिवाय आणखी दोन शेळ्या गंभीर जखमी झाल्या आहेत. घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे वनरक्षक शरद पांडव व वनसेवक बाळासाहेब डोंगरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

दरम्यान, जांबुत परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांनी वन विभागाने तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली आहे.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



SALE 25 TO 50 % OFF
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी
क्लॉथ सेंटर | सिल्क अँण्ड सारीज
मनासारखी खरेदी आणि भरपूर फायदा देणारा सेल
(संपूर्ण ए.सी. शोरुम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

# कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटरमध्ये राज्य कर्मचारी विमा योजना (ESIC) विभागाचा शुभारंभ

## संगमनेरमध्ये राज्य कर्मचाऱ्यांसाठी अत्याधुनिक आरोग्यसेवेची नवी सुविधा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील नामांकित कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर येथे राज्य कर्मचारी विमा योजना (ESIC) विभागाचा शुभारंभ बुधवार दि. २९/०७/२०२६ रोजी सकाळी १० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. या सुविधेमुळे ESIC योजनेअंतर्गत येणाऱ्या कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना दर्जेदार आणि अत्याधुनिक वैद्यकीय सेवा उपलब्ध होणार आहेत. या उद्घाटन समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा. आमदार अमोल खताळ (सदस्य, विधानसभा, महाराष्ट्र राज्य) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमास ESIC विभागातील सर्व सुविधा व्यवस्थापक व कार्डधारक यांची विशेष उपस्थिती राहणार असून, या माध्यमातून कुटे हॉस्पिटलमध्ये ESIC लाभार्थ्यांसाठी विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटरचे डॉ. सोनाली व डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे यांनी वैद्यकीय क्षेत्रात आधुनिक उपचार पद्धती, अत्याधुनिक सुविधा आणि रुग्णकेंद्री सेवा यासाठी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. एडखउ विभागाच्या माध्यमातून सामान्य कर्मचारी वर्गाला उत्तम आरोग्यसेवा सहज उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. संगमनेरसह परिसरातील ESIC कार्डधारकांना आता विविध उपचार, तपासण्या आणि शस्त्रक्रिया सुविधा अधिक सुलभपणे मिळणार आहेत. आरोग्यसेवेच्या क्षेत्रात ही सुविधा एक महत्त्वपूर्ण पाऊल मानली जात आहे. कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर हे ताजणे मळा, नवीन नगर रोड, ४० फूटी डी.पी. रोड, संगमनेर येथे कार्यरत असून, रुग्णांना आधुनिक तंत्रज्ञानासह अनुभवी वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देत आहे.

आरोग्यसेवा हीच समाजसेवा या भावनेतून कुटे हॉस्पिटलने सुरू केलेली ESIC विभागाची ही सुविधा संगमनेर परिसरातील हजारो कर्मचारी व त्यांच्या कुटुंबांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
राज्य कर्मचारी विमा योजना (ESIC) विभागाचा
॥ उद्घाटन समारंभ ॥
बुधवार, दि. २९/०७/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता
• शुभहस्ते •
मा. आमदार अमोलभाऊ खताळ
सदस्य, विधानसभा, महाराष्ट्र राज्य
ESIC विमाधारक व त्यांच्या कुटुंबियांसाठी मोफत वैद्यकीय सुविधा
OPD तपासणी, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला आवश्यक तपासण्या, औषधोपचार, IPD उपचार, आपत्कालिन सेवा
• प्रमुख उपस्थिती • सर्व ESIC सुविधा व्यवस्थापक व कार्डधारक
• आपले नम्र • डॉ. सोनाली प्रदीप कुटे | डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे
पत्ता - ४० फुटी डि.पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
ओममयूर ज्वेलर्स

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी | योनी मार्गाची दुर्गंधी
अंगावरून पांढरे जाणे | गुप्त अंगाला खाज
गर्भ न रहाणे | विविध त्वचा विकार
वारंवार गर्भपात होणे | गुप्तरोग, गर्मी
गर्भाशयात गाठी | लघवीला जळजळ
गर्भाशयाचा कर्करोग | संभोगात रस न येणे
स्तनांची वाढ न होणे | संभोगा विषयीची भीती
स्तनातून दूध न येणे | हस्तमैथूनाची सवय
स्तनात गाठी | लैंगिक विकृती
स्तनाचा कर्करोग | मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट
स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
अॅम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25